# भांडवलाचा सरंजामी देव बाळ ठाकरे

सुधीर ढवळे



रिपब्लिकन पँथर्स प्रकाशन क्रमांक – ९

# भांडवलाचा सरंजामी देव : बाळ ठाकरे

लेखक : सुधीर ढवळे

पहिली आवृत्ती

प्रकाशन : दि. १० जानेवारी २०१३
पँथर भागवत जाधव शहिद दिन

© कॉपीराईट नाही,
जनहितार्थ पुनर्प्रकाशनाचा मुक्त परवाना

टाईप सेटींग व मुद्रण : प्रितम नागदिवे, लकी ग्राफीक्स,
३, चंद्रनगर, नागपूर. मो. ९३७३०४१४४२

मुखपृष्ठ संयोजन : गोपाल नायडू, कर्णबोधी मांडवे

प्रकाशक : शरद गायकवाड
रिपब्लिकन पँथर्स प्रकाशन
२८९, पंचशील चाळ, लुंबिनीबाग,
गोवंडी (प), मुंबई

प्रतींसाठी संपर्क: ९७०२७०७५८३ (मुंबई), ९१४५७६४१९४ (नागपूर)
९३२२५८४२०८ (सांगली), ९८९०२११२९१ (पुणे)

खाजगी वितरणासाठी

**सहयोग राशी : रुपये १५/-**

# समर्पण

शिवसेनेच्या भ्याड हल्ल्यात शहिद झालेल्या
कॉ. कृष्णा देसाई व पँथर भागवत जाधव
या लढवय्यांच्या चिरंतन स्मृतीस

# भूमिका

"सत्याचरणाशिवाय मानवी प्राणी जगात सुखी होऊ शकत नाही."

— जोतीराव फुले

एखाद्या व्यक्तीला एखाद्या गुणांचे प्रतिक मानून जर कुणी त्यापुढे नतमस्तक होत असेल, किंवा त्याच्याविषयी प्रेम, आदर व स्मृती बाळगत असेल तर तसे करण्यात त्याची काहीही चुक नाही. आमच्यासारख्या निरिश्वरवाद्याने त्याबाबत नाराजी दाखविण्याचेही काही कारण नाही. निरीश्वरवादी माणसाने सुद्धा भावनाशील असावे व भावनांचा आदरही करावा. कारण भावना हा श्रेष्ठ मानवी गुण आहे. परंतु समाजाने भावनांनाच 'प्रमाण' मानू नये. सत्यशोधन करण्यासाठी प्रमाण म्हणून बुद्धी, पुरावा, साक्ष व तर्क यांचे जे एक विशिष्ट स्थान आहे, ते स्थान भावनांना देणे साफ चूक आहे. प्रत्येक विश्वासाला तर्क, वस्तुस्थिती आणि वैज्ञानिक अनुभवांच्या कसोटीवर पारखले पाहिजे. ईश्वर तसेच एखाद्याविषयी वाटणाऱ्या प्रेमादराचा दुराग्रह किंवा अनादर होऊ न देणे, हे तत्व समाज शिक्षणात पायाभूत असले पाहिजे. पण ज्या देशातील सत्ताच मुठभर उच्च जातवर्गीयांच्या हितासाठी एखाद्या बाळ ठाकरेला त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे असंख्य गुन्हे दडवून 'देव' बनविण्याच्या उद्योगात लागलेली असेल आणि जनतेच्या मेंदूत त्या 'देवा'ची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न करीत असेल, तेव्हा त्या देशातील सत्याचरणी व विवेकवादी माणसानेही समाज मनातील या 'देवा'च्या व तो निर्माण करणाऱ्या व्यवस्थेच्याही उच्चाटनाची मोहीम तातडीने सुरू केली पाहिजे. याची सुरूवात देवाच्या उलटतपासणीने करूया. हा 'देव' जर खरा असेल तर तो कुठल्याही चिकित्सेतून तावून सुलाखून बाहेर पडेल!

हे प्रबोधन ब्राम्हणी फॅसिझमविरोधी प्रतिकारातून आलेले असल्यामुळे त्याचे स्वरूप स्थितीवाद्यांना व ब्राम्हणी सत्तेला विध्वंसक वाटणे साहजिक आहे. पण याला दुसरा इलाज नाही

१ जानेवारी २०१३
भीमा कोरेगाव शौर्य दिन

**सुधीर ढवळे**
मध्यवर्ती कारागृह, नागपूर

# भांडवलाचा सरंजामी देव - बाळ ठाकरे

'मैने उम्र भर उसके खिलाफ सोचा और लिखा है
अगर उसके शोक में सारा देश शामिल है
तो इस देश से मेरा नाम काट दो...' – पाश

शिवसेना प्रमुख बाळ ठाकरे यांचे नुकतेच ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर सत्ताधारी वर्गाने उडवलेला धुराळा आता बऱ्यापैकी जमिनीवर विसावलाय. आता या शांत वातावरणात बाळ ठाकरे यांच्याविषयी माध्यम जगतात उमटलेली मते–मतांतरे यावर समाजशास्त्रीय व ऐतिहासिक दृष्टीकोणातून विवेचन करण्याचे धाडस केले पाहिजे.

बाळ ठाकरेंच्या मृत्युनंतर त्यांच्यातील अंतर्विरोध व अत्यंत विषारी मतांवर माध्यमांनी जाणीवपूर्वक पडदा टाकला. ही मतं लोकांमध्ये चर्चेला येवू दिली नाही आणि वरवरच्या गुळगुळीत चर्चा तेवढ्या घडवून आणल्या. त्यांची हिंसक जूलूमशाही व भावना भडकवणाऱ्या वक्तृत्वावर फारसं भाष्य करण्यात आलं नाही. सद्वर्तनाच्या क्षुल्लक गोष्टींचा नुसता भडीमार करण्यात आला. माध्यमांनी (वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या) रंगवलेली व प्रस्थापित लेखक–बुद्धिजीवी आणि संसदीय राजकारण्यांनी जनतेच्या माथी मारलेली ठाकरे यांची प्रतिमा ही पूर्णपणे अनैतिहासिक, असत्य व पाखंडी आहे. म्हणून व्यवस्थेच्या समर्थकांना जून्या आठवणीत रमू द्या, दुःखात वाहू द्या, 'देव' मानू द्या. पण जागल्या लेखक–कार्यकर्त्यांनी या 'देवा'चे कर्तृत्व आणि इतिहास यांचा लेखा–जोखा जनतेसमोर मांडला पाहिजे. एका विशिष्ट विचाराने, भावनेने वातावरण तापलेले असल्यामुळे निराळा व सत्य विचार मांडणारा टिकेचे भक्ष्य होईल, याची सुस्पष्ट जाणीव आहे. त्यामुळेच अभिव्यक्तीचे धोके पत्करण्याचे धाडस आम्ही करीत आहोत.

जगभराप्रमाणेच आज भारतातही विचार, मतं आणि मिथके तयार करण्याचा धंदा माध्यमांनी सुरू केलेला आहे. कॉर्पोरेट जग व गुन्हेगारी (नेते, अधिकारी, व्यापारी, ठेकेदार, बिल्डर, माफिया व काळा पैसा) भांडवल या दोघांनी मिळून वृत्त माध्यमांचा, विशेषतः न्यूज चॅनल्सचा अंडरवर्ल्ड बनलेला आहे. ज्यात मालक–संपादक हे बातम्यांचे सौदागर बनलेले आहेत. माध्यमातील या

अंडरवर्ल्डच्या नफ्याच्या लालसेपायी व कॉर्पोरेटच्या वाढत्या दबावामुळे संपादक आणि वार्ताहर यांना हप्ता वसुली करणाऱ्या हिटमॅन व शार्प शूटर्स मध्ये रूपांतरीत केलेले आहे. म्हणून ही माध्यमं व्यवस्थेच्या पातळीवर खोटं बोलण्यासाठी बाध्य आहेत. या पार्श्वभूमीवर बाळ ठाकरेंच्या निधनानंतर त्यांना लावलेली विशेषणे कां लावलेली आहेत, हे समजून येईल व त्याचबरोबर त्यामागची अर्थिक व राजकीय गुपितं काय आहेत हेही समजून घेण्यास मदत होईल.

## खुजे नेते आणि लार्जर दॅन लाईफ प्रतिमा

जर्मनीच्या लेनी रीफेंस्थाल यांनी हिटलरच्या उदय काळात त्यांचा एक मोर्चा आणि जनतेसमोर केलेल्या भाषणाचे चित्रांकन केले होते. संपादन आणि पुनर्ध्वनीमुद्रणानंतर त्या वृत्तचित्राचा प्रभाव विलक्षण होता. एका दृश्यामध्ये भाषण देणाऱ्या खुज्या उंचीच्या हिटलरच्या पाठीमागे सूर्य आहे आणि हिटलरची विराट सावली व्यापक क्षेत्रापर्यंत जातांना दाखवलेली आहे. शक्यतो जागतिक चित्रपटामध्ये प्रथमच लार्जर दॅन लाईफ प्रस्तूतिकरण करण्यात आलेलं होतं. पार्श्वसंगीत आणि इतर चित्रपट तंत्रज्ञानाद्वारे हिटलरने पृथ्वीवर उतरून अवतार घेतल्यासारखे त्याला प्रस्तूत करण्यात आले होते. हिटलर बाळ ठाकरेंसाठी आयडॉल होता. बाळ ठाकरेंच्या निधनानंतर आपण याहून वेगळं असं काय दृश्य पाहत आहोत?

'महावृक्ष उन्मळून पडला'... 'वादळ शांत झाले'... 'लोकनेता गेला'... 'झंझावात विरून गेला'... 'कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली'... 'जिंदा दिल माणूस'... 'धगधगते अग्निकुंड'... 'करिश्माई मास लीडर'... तर कुणी त्यांना 'सूर्य' अशी विशेषणे लावली. माध्यमांनी त्यांना एक मुक्तिदाता रंगविण्यात कसलीही कसर बाकी ठेवली नाही. आणि राजकीय व्यवस्थेनेही २१ तोफांची सलामी देऊन त्यांना 'महान' बनविले!

आयुष्यभर सत्ता विरोधी(?) राजकारण करणाऱ्या बाळ ठाकरे यांना त्यांच्या मृत्युनंतर प्रस्थापित सत्तेने असे डोक्यावर कां घ्यावे? बाळ ठाकरे ज्या प्रस्थापित सत्ताधारी वर्गाची निर्मीती होते, त्यांच्या गेल्यानंतर त्याच राजकीय व्यवस्थेने त्यांना लवून मानाचा मुजरा करावा यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे?

त्यांच्या व्यवस्थेसाठी बाळ ठाकरे म्हणजे एक 'सेफ्टी व्हॉल्व'च नव्हते, तर त्यांनी या राजकीय व्यवस्थेला जनमानसात मान्यता मिळवून दिली होती. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांनी या व्यवस्थेवरून उडालेला जनतेचा विश्वास पुन्हा त्याच व्यवस्थेवर कायम राखण्यात महत्वाची भूमिका बजावली होती. व्यवस्थेविरोधी राग व असंतोषाला याच व्यवस्थेत चॅनेलाईज केले, व्यवस्थेबाहेरील पर्यायाकडे जाऊ दिले नाही. हेच त्यांचे व्यवस्थेसाठीचे महान योगदान! म्हणून देशातील व्यवस्थेने ठाकरेंपुढे नतमस्तक होणे हा देखावा नव्हता तर व्यवस्थेची ती एक प्रामाणिक व गंभीर कृती होती.

अंत्ययात्रेत उसळलेला लाखोंचा जनसागर ते 'मास लीडर' असल्याचा आभास निर्माण करते. पण ही सुद्धा केवळ कल्पना आहे. गर्दीचा करिश्मा त्यांच्यातील अंतर्विरोधाचाच परिणाम होता. एकीकडे मराठी हिंदू माणसाचा 'सर्वोच्च नेता' तर दुसरीकडे बॉलीवूड व कॉर्पोरेट–माफिया जगताचाही मित्र आणि विश्वासू तसेच व्यवस्थेचाही आतला माणूस. या सर्वांची गोळाबेरीज म्हणजे लाखोंचा जनसागर. ते वर्गसमन्वयवादी होते म्हणून सर्वांचेच ते 'डॉर्लिंग' बनले! आता त्यांनी सगळ्यांना कसं सांभाळलं, पेललं आणि कुणाला कसं फसवलं हाच येथे संशोधनाचा मुद्दा आहे.

जोपर्यंत कोणत्याही प्रकारचा विद्रोह उच्च जातीवर्गाच्या हितसंबंधांच्या आड येत नाही, तोपर्यंत उच्च जात–वर्ग त्याचे नेहमीच कौतुक करीत असतात. प्रसंगी त्या विद्रोहाचे भाटही बनतात. बाळ ठाकरेंच्या निधनानंतर महाराष्ट्रात जे काही चाललंय ते यापेक्षा वेगळं काय आहे?

बाबासाहेब आंबेडकर यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास "बुध्दिमान माणूस चांगला माणूसही असू शकतो, परंतु तो सहजगत्या लुच्चाही बनू शकतो... बुध्दिजीवी लोकांची टोळी मदतीला सिद्ध असणारी, चुकीच्या मार्गापासून मानवतेला वाचवणारी असू शकते किंवा ती एक भामट्यांची टोळी किंवा आपला चरितार्थ चालविण्यासाठी दुष्ट धंदे करणाऱ्या वकिलांची चांडाळ चौकडीही असू शकते. भारतातील बुद्धिजीवी लोकांचे केवळ दुसरे नाव 'ब्राम्हण' आहे. हा विचार मोठा दुःख दायक आहे."

बुद्धिजीवींची एक मोठी टोळी आज ब्राम्हण–बनियाद्वारे नियंत्रित माध्यम

जगतामध्ये सक्रिय आहे. सर्व संपादक ब्राम्हण जातीचे असून तेच बौद्धिक दहशतीचा भडीमार करीत आहेत. संपादक–वार्ताहर–लेखकांची ही टोळी अज्ञानाला ज्ञान संबोधते, अनितीला नीती म्हणते, असत्याला सत्य म्हणून ठसवते. द्वेष व स्वार्थ पेरते आणि बुद्धिभ्रम करून भेज्यात गोळी मारते. ही टोळी उच्च जात–वर्गीयांच्या लुटारू व्यवस्थेची समर्थक आहे. हीच टोळी ठाकरेंच्या निधनानंतर त्यांना ऐतिहासिक महापुरूष बनविण्याच्या उद्योगात लागलेली आहे. ठाकरेंची जी नवी फ्रेम तयार केली जात आहे, ती बिनबोभाट भय, दमन आणि खोटारडेपणाच्या आधारावर केली जात आहे. 'शानदार लोकं', 'व्यवस्थाविरोधी विद्रोही विचारवंत' नेहमीप्रमाणेच कोणताही धोका न पत्करता गप्पगार आहेत. ते तमाशा बघणारे लोकं आहेत. पण जेव्हा इतिहास चुकीच्या पद्धतीने लिहिला जात होता त्यावेळची पिढी काय करीत होती, हे येणारी पीढी उद्या विचारेल. म्हणून आजच या फ्रेमवर प्रामाणिकपणे, टिकात्मक हस्तक्षेप करण्याचे धाडस केले पाहिजे. इतिहासाच्या पुनर्लेखनावर पुन्हा पुनर्लेखन केले पाहिजे. ही काळाची गरज आहे. फुले, आंबेडकर व भगतसिंग यांच्या खऱ्या वारसदारांचे ते आद्य कर्तव्य आहे.

एक चिनी विचारवंत म्हणतो, 'खुज्या माणसांची सावली जेव्हा मोठी होऊ लागते तेव्हा लवकरच काळोखाला सुरूवात होणार आहे, असे समजावे'. आज सर्वच क्षेत्रात खुज्या लोकांचे बहुमत आहे. संसदेतही त्यांचेच बहुमत आहे. व्यवस्थेतील सारेच खुजे मिळून महानतेचा उद्योग करीत असतात. एखाद्या व्यक्तीच्या मृत्युनंतर असा उद्योग करून ते स्वतःलाच महान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत असतात. कारण हे जग माणसांच्या राहण्यालायकीचं करण्यात त्या व्यक्तीचा किती हातभार लागला याच्याशी त्या व्यक्तीचं 'महात्म्य' निगडीत असते. 'महान' तोच जो निर्मिती करतो, जीवनदान देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा गांधी यांच्या महात्मेपणाविषयी लिहिलेल्या शब्दात सांगायचे झाल्यास "आजपर्यंत इतिहासाचा पुरावा असा आहे की, महात्मे धावत्या आभासासारखे असतात, त्यांच्या धामधुमीने धुरळा खूप उडतो, पण तो समाजाची पातळी मात्र उंचावू शकत नाही."

पण हे सत्य कुणी पुढे आणायला गेलं तर ते किती धोकादायक ठरू शकते याचा प्रत्यय बाळ ठाकरे यांच्या निधनानंतर लगेच आला. बाळ ठाकरे यांच्या

निधनानंतर पालघर येथील शाहीन धाडा या तरूणीने तिच्या फेसबुकवर काही मते नोंदवली. "संपूर्ण आदर व्यक्त करुन मला हे म्हणावयाचे आहे की, दररोज हजारो लोकं मरतात, परंतु या जगाचे रहाट सुरुच असते. कुण्या एका राजकारण्याच्या नैसर्गिक मृत्युपायी लोक एवढे उद्विग्न कशासाठी आहेत. त्यांनी एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, आम्ही आपल्या इच्छेने नव्हे तर नाईलाजास्तव एवढे विनम्र आहोत. आणि शेवटी आपण शहिद भगतसिंग, आझाद, सुखदेव किंवा इतर कुणाकरिता आदर केव्हा व्यक्त केला होता किंवा दोन मिनीटांचे मौन पाळले होते. जेव्हा की, अशा लोकांमुळेच आज आपण स्वतंत्र आहोत. आदर कमावला जातो, बळजबरीने घेतला जात नाही. आज मुंबई बंद असेल तर आदर आहे म्हणुन नव्हे, तर भयामुळे." इतकेच तिचे म्हणणे होते. शाहीनच्या फेसबुकवरील या मतातून धार्मिक भावना दुखावणार असल्याचा साक्षात्कार पोलीसांना झाला. पोलीसांना व महाराष्ट्र शासनाला या तरूणीचे हे विचार दहशतवाद्यांच्या बॉम्बपेक्षाही स्फोटक वाटले. म्हणूनच एका सैनिकाच्या तक्रारीनंतर तिला रात्री घरी जाऊन अटक करण्यात आली. या मताला 'लाईक' केले म्हणून रिनी श्रीनिवासन या तिच्या मैत्रिणीलाही अटक करण्यात पोलीसांनी कोणतीही हयगय केली नाही. पोलीसांच्या या महान कामगिरीबद्दल महाराष्ट्राचे लाडके गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी त्यांच्या या पोलीसांची शिफारस शौर्य पुरस्कारादाखल मिळणाऱ्या राष्ट्रपती पदकासाठी केल्यास कुणाची हरकत नसावी! बिचाऱ्या पोरी, व्यंगचित्रकार असीम त्रिवेदी प्रमाणे देशद्रोहाच्या खटल्यापासून सुटल्या!

या प्रकरणात कारवाई करू नका असे स्पष्ट आदेश अतिरिक्त पोलीस महासंचालक व पोलीस महानिरिक्षकांनी दिले होते असे नंतर तपास अहवालातून पुढे आले. पण यामुळे एक असा प्रश्न उपस्थित होतो की वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे आदेश डावलण्याची हिंमत साध्या पोलीस निरिक्षक व अधिक्षकांची झालीच कशी? याचाच अर्थ त्यांना थेट महाराष्ट्र शासनाकडून तरी तसा आदेश आलेला असावा. पण हे सत्य जनतेसमोर केव्हा येणार?

## कृती, विचार आणि इतिहासाच्या खोदकामातून पुढे येणारा चेहरा

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र बनला त्यावेळी शिवसेनेचा जन्म सुध्दा झालेला

नव्हता. संयुक्त महाराष्ट्र समितीद्वारे लढलेल्या दीर्घ लढ्यात आचार्य अत्रे, कॉम्रेड डांगे, एस.एम. जोशी, दत्ता देशमुख, दादासाहेब गायकवाड यांच्यासह बाळ ठाकरे यांचे वडील केशव सीताराम उपाख्य प्रबोधनकार ठाकरे हेही सामील होते. लाल बावटा कला पथकातील त्रिमुर्ती गणल्या गेलेले शाहीर अमरशेख, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर यांच्यासह शाहीर आत्माराम पाटील आणि बापट, साबळे, हेगडे इत्यादी शाहीर आणि आंबेडकरी जलसाकार यांनी ही चळवळ घरोघरी पोहचवली होती. आज शिवसेनेच्या अग्रभागातील नेत्यांचे वय त्यावेळी शाळा आणि कॉलेजमध्ये शिकण्याचे होते. म्हणूनच त्या लढ्यात या शिवसैनिकांपैकी कुणीही सामील नव्हते. इतकेच काय खुद्द बाळ ठाकरे सुध्दा त्यात सामील नव्हते. पण आज काही 'राष्ट्रवादी' इतिहासकार मात्र असत्य सांगत सुटलेले आहेत. त्यापूर्वी बाळ ठाकरे पत्रकारिता करीत होते व १९६० मध्ये त्यांनी त्यांचा धाकटा भाऊ श्रीकांतसह 'मार्मिक' साप्ताहिक सुरू केले होते.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर त्यावेळची संयुक्त महाराष्ट्र समिती इतिहासात जमा झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या लाटेवर स्वार होऊन ती एका राजकीय शक्तीचे रूप घेऊ शकली नाही. म्हणून १९६२ च्या निवडणुकीतून काँग्रेसने पुन्हा महाराष्ट्रावर आपला झेंडा कायम केला. यशवंतराव चव्हाणांच्या मुख्यमंत्रीत्व काळातच शेतकरी कामगार पक्षातील नेते काँग्रेसमध्ये सामील झाले. बी.सी. कांबळे यांच्या नेतृत्वाखालील दुरूस्त रिपब्लिकन पक्ष हा १९६२ च्या निवडणुकीपासून महाराष्ट्रात सत्ताधारी वर्गाच्या काँग्रेस पक्षाला अनुकूल असेच राजकीय पवित्रे घेत राहिला. तर १९६२ च्या भारत चीन युध्दासंबंधी कम्युनिस्ट पक्षाच्या अधिकृत भूमिकेमुळे या पक्षाला जनतेत तोंड दाखवणे मुश्किल झाले होते. कम्युनिस्टांच्या कामगार संघटनेत वाढलेल्या पीढीची मुलं पुढे शिवसेनेत सामील झाली. १९६४ मध्ये कम्युनिस्ट पक्षाचे विभाजन होऊन कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हा नवा पक्ष स्थापन झाला. या नव्या पक्षाने बंगाल व केरळमध्ये जोर धरला. याच काळात पंजाबमध्ये अकाली दलाने जोर धरला. १९६४ मध्ये नेहरू वारले. १९६५ मध्ये समाजवाद्यांमध्ये मोठी फुट पडली. १९७९ नंतर इंदिरा गांधी यांचे नेतृत्व स्थापित झाले. पण तोपर्यंची ५ वर्षे काँग्रेस आणि पर्यायाने देशाच्या राजकारणाच्या पातळीवर दिशाहिनतेची राहिली.

याच राजकीय–सामाजिक पोकळीत शिवसेनेचा जन्म १९ जून १९६६ रोजी

झाला. याच दिवशी शिवाजी पार्क वरील सभेत प्रबोधनकारांनी 'शिवसेने'ची घोषणा केली. हा काळ नक्षलवादी चळवळीने भारलेला होता. याच काळात तामिळनाडूत १९६७ च्या निवडणुकीनंतर द्रविड मुनेत्र कडघम (द्रमुक) हा पक्ष सत्तेत आला आणि करूणानिधी मुख्यमंत्री बनले. भारताच्या संसदीय राजकारणावर लोहियांच्या गैरकॉंग्रेसवादाच्या वादळाने अनेक राज्यांमध्ये कॉंग्रेसची पाळेमुळे उपटून फेकली होती.

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, हा काळच देशभरात सत्तेविरोधी बंड, प्रादेशिक अस्मिता आणि भाषिक–सांस्कृतिक अभियानाने भारलेला होता. शिवसेनाही त्या काळात अशाच प्रादेशिक–भाषिक अभियानाचे प्रतिक होती. १९६७ पासून भारतीय राजकारणात प्रादेशिकवादाचं सुस्पष्ट प्रतिबिंब दिसून येते. अनेक राज्यांमधून प्रादेशिक अस्मितेवर उभ्या झालेल्या राजकीय पक्षाने त्या त्या राज्यातून कॉंग्रेसला जवळपास हद्दपारच केले. राजकीय सत्तेचा व विकासाचा समतोल साधला गेला नाही म्हणून भाषावाद, प्रदेशवाद व वांशिकतेच्या आधारे अस्मितेच्या चळवळी देशभरात फोफावल्या. या तुलनेत बाळ ठाकरेंचा 'करिश्मा' असूनही मात्र शिवसेनेला मागील ४६ वर्षात महाराष्ट्रात पाहिजे तसा जम बसवता आला नाही. १९९५ मध्ये राज्यात शिवसेना सत्तेत जरूर आली पण भाजपशी युती करून. ही युती करूनही स्पष्ट बहुमत मिळालं नव्हतं आणि सरकार स्थापन करण्यासाठी डझनभर अपक्ष आमदारांची खरेदी करावी लागली होती. शरद पवारांचे सच्चे चेले अपक्ष आमदारांच्या वेषात सेना–भाजपच्या युती सरकारात सामील झाले होते. याशिवाय त्यामागे १९९२ मधील बाबरी मशिद विध्वंस व त्यानंतरच्या मुंबई दंगलीची पार्श्वभूमी होतीच. आक्रमक हिंदुत्ववाद आणि कॉंग्रेसच्या गटबाजीमुळेच युतीला सत्ता मिळाली होती. १९९९ मध्ये शरद पवारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष स्थापन करून मुळ कॉंग्रेस पक्षात फुट पाडली. त्यानंतर शिवसेना पुन्हा सत्तेत येवू शकली नाही. आताही त्यांना केवळ १६ टक्के मते मिळालेली आहेत. याचा अर्थ एवढाच आहे की सेना–भाजप युती सत्ता प्राप्त करण्यासाठी आपल्या कार्याऐवजी कॉंग्रेसच्या नाकर्तेपणावर अवलंबून होती. आणि बाळ ठाकरेंचा जो काही करिश्मा आजवर रंगवून रंगवून सांगितला गेलाय तो सुद्धा कधीच आपला रंग दाखवू शकलेला नाही, हा इतिहास ताजा व जिवंत आहे.

भारतातील सत्ताधारी वर्ग 'वर्ग' म्हणून अन्य पाश्चिमात्य देशांतील सत्ताधारी वर्गाप्रमाणे एकसंघ नाही. कारण तो विविध जातीत विखुरलेला आहे. त्याचे हितसंबंध या खंडप्राय देशात आपापल्या प्रदेशांशी निगडीत आहेत. पाश्चिमात्य देशांत भांडवलदार वर्गाने ज्याप्रमाणे आपल्या हितसंबंधांना सुरक्षित ठेवण्यासाठी राष्ट्रवादी विचारसरणीचा पुरेपूर वापर करून घेतला, त्याप्रमाणेच भारतातील विविध राज्यांत प्रादेशिक चळवळी मूळ धरू लागलेल्या होत्या. शिवसेना अशाच हितसंबंधी सत्ताधारी वर्गाची निर्मिती होती. मुंबईच्या त्यावेळच्या भांडवलदारांचीही ती एक गरज होती. म्हणूनच शिवसेनेची सत्तेशी जवळीक कधी लपून राहिली नाही. ही जवळीक इतकी घनिष्ट होती की त्यावेळी शिवसेनेला तत्कालीन महाराष्ट्राचे कॉंग्रेसचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या नावावर चक्क 'वसंत सेना' असे संबोधले जाई. कॉंग्रेसची ती एक राखीव सेना होती आणि 'टायगर'च्या गळ्यातही कॉंग्रेसचा पट्टा होता. इतर प्रादेशिक पक्षांनी त्यांच्या राज्यात जे सत्तेत येण्याचं व संघटना बांधणीचं कार्य करून दाखवलं, बाळ ठाकरेंच्या शिवसेनेला इतकं मोठं 'कॉंग्रेसी बळ' असूनही महाराष्ट्रात ते कां करता आलं नाही?

भूमिपुत्रांच्या नावावर बेंबीच्या देठापासून ओरडणाऱ्या शिवसेनेने गुजराती, मारवाडी इत्यादी अमराठी भांडवलदार, व्यापारी, मलबार हिल, पेडर रोड, नेपियन सी रोड आणि प्रतिष्ठित दक्षिण मुंबईवर कब्जा जमविणाऱ्या धनाढ्य अब्जाधीशांविरूध्द कधीही 'ब्र' सुध्दा उच्चारला नाही. याउलट त्यांच्या उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मराठी कामगारांच्या संघटना संपविण्याचे व संप फोडण्याचे उद्योग मात्र त्यांच्या गुंड सैनिकांनी ईमाने इतबारे केले. मुंबईतील गिरण्यांचे बहुसंख्य मालक अमराठी होते. पण जवळपास सारेच कामगार मराठी होते. या कामगारांच्या ट्रेड युनियन मुख्यतः संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अग्रेसर असलेल्या कॉम्रेड डांगे यांच्या कम्युनिस्ट पक्षाशी निगडीत होत्या आणि त्या लढ्यापासून आपल्याला प्रेरणा मिळाल्याची कबुली ठाकरे यांनी स्वतः दिलेली होती. अमराठी उद्योगपतींपासून सुपारी घेऊन मराठी कामगारांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम सेना प्रणित कामगार संघटनांनी खुलेआम केले. 'मराठी माणूस' च्या नावावर 'जला दो, जला दो, लाल बावटा जला दो'च्या घोषणा देत डिसेंबर १९६७ मध्ये परळच्या दळवी बिल्डींगमधील कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयावर

हल्ला केला. पुढे कम्युनिस्टांवरील हल्ल्याचे लोण मुंबईभर पसरले. ५ जून १९७० रोजी आमदार कॉ. कृष्णा देसाईंचा खून करून कामगार वसाहतीत शिवसेनेने आपली दहशत स्थापित केली. वामन महाडीक यांच्या रूपानं रिक्त जागेवर सेनेनं आपला पहिला आमदार निवडून आणला. 'बाळ' आता 'टायगर' झाला होता. आणि या टायगरच्या सुळ्यांना मानवी रक्ताची चटक लागली होती. कम्युनिस्टविरोधी हिंसक लाटेवर स्वार होऊन पुढे अनेक जण सेनेचे बडे नेते बनले. बाळ ठाकरे आणि त्यांच्या या नेत्यांनी कोणत्या मराठी कामगारांचे भले केले?

मागील ४६ वर्षात सेनेने मराठी माणसांचा विकास, शहर, भाषा, संस्कृती, जीवनशैली, शिक्षण, रोजगार व आरोग्याचे कोणते प्रश्न उचलले आहेत, त्यासाठी संघर्ष केला आहे आणि यश प्राप्त केले आहे? बेजबाबदार भाषणबाजी, हुल्लडबाजी, झुंडशाही, दादागिरी आणि शिवाजी महाराजांच्या नावावर गुंडागर्दी यापेक्षा शिवसेनेने वेगळे काय केले आहे? सनक आल्यावर दुकानांवरील नावाच्या पाट्यांवर काळा रंग फासणे, व्हॅलेंटाईन डेवर हल्ले करणे पण मायकल जॅक्सनचा नाच स्वतः भरविणे, फायर व वाटर सारख्या चित्रपटांच्या विरोधात दंगली करणे पण घरातील सून स्मिता व मुलगा बिंदूमाधव यांना मात्र मराठीऐवजी हिंदी चित्रपट बनवू देणे, 'घाशीराम कोतवाल' वा 'सखाराम बाईंडर' यासारख्या पुरोगामी मराठी नाटकांवर हल्ले करणे, स्वतः व्यंगचित्रकार व पत्रकार–संपादक असूनही शिवसेनेवर टिका करणाऱ्या वृत्तपत्रांवर व मराठी पत्रकारांवरही हल्ले करणे... यासारखे दहशत स्थापित करण्याशिवाय दुसरे काय केले? शिवसेना स्थापनेवेळी दक्षिणेतील लुंगीवाले ('उठाव लुंगी बजाव पुंगी') नंतर कम्युनिस्ट ('जला दो, जला दो, लाल बावटा जला दो') नंतर दलित ('ज्यांच्या घरी नाही पीठ, ते मागतात विद्यापीठ) नंतर मुस्लिम (लांडे व 'दहशतवादी') आणि आता मागील काही वर्षांपासून बिहार–उत्तर प्रदेशातील हिंदी भाषिक ('एक बिहारी, सौ बिमारी') व झोपडीवासी बांग्लादेशीयांवर (पाकडे) हल्ले करून दंगल घडविणे, वातावरण विषारी करणे, तोडफोड करून दहशत माजविणे आणि वृत्तपत्रे व वृत्त वाहिन्यांना सनसणीखेज ब्रेकींग न्युज पुरविणे, यासारखे कार्यच सेना आजवर करीत आली आहे.

कॉंग्रेसच्या नेतृत्वात स्वप्नाळू समाजवाद्यांच्या मदतीने सहकार चळवळीने

जोर धरला. गवताप्रमाणे जेथे तेथे साखर कारखाने उगवले. तसेच शेकडो सहकारी बँका, शिक्षण संस्था, सहकारी संस्था, पतपेढ्या, खरेदी विक्री संघ, बचत गट इत्यादींचं जाळं विणण्यात कॉंग्रेस अग्रेसर राहिली. यातून कॉंग्रेसी नेते गब्बर सम्राट बनले आणि त्यातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या नसनाड्यांवर प्रभुत्व स्थापित केले. पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांच्या या दादागिरीविरूध्द आव्हान देणारं कोणतं संस्थाबध्द कार्य सेनेने मागील ४६ वर्षात केलंय? झुणका भाकर केंद्र, शिव वडा पाव आणि काही उद्योगांमध्ये संप फोडीच्या उपकाराची परतफेड म्हणून काही कार्यकर्त्यांची नोकरीची सोय झाली व मद्राशांकडे मिळणाऱ्या स्टेनोग्राफर, सेक्रेटरी पदाच्या जागा तेवढ्या मिळाल्या. शिवसेनेची हीच 'क्रांतिकारी' मागणी होती! शिवसेनेचा आर्थिक विचार वडा पावच्या गाडी पलिकडे कधी गेला नाही. मराठी उद्योजकता, औद्योगिक विकास, कृषी विकास, लघुउद्योग व विविध लोकोपयोगी कल्याणकारी योजनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण बनवून त्यानुसार योजना आखणे, सत्तेत असताना त्यावर अंमल करणे, त्यासाठी लढायचे सोडून दहशत, हप्ता वसुली, दलाली व संधीसाधू राजकारणाच्या बळावर गडगंज संपत्ती जमविणे. हा कुठला आहे 'मराठी माणूस'चा न्याय! कोणत्याही अफाट संपत्तीमागे गुन्हे दडलेले असतात हे जागतिक सत्य आहे. हे ठाकरेंना व शासनालाही माहित होते, म्हणून अशा 'एकटा टायगर'ला त्यांच्या गुन्ह्यांपासून संरक्षण देण्यासाठी त्यांच्या घराभोवती पोलिसांचा पोलादी पहारा बसवलेला होता. त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकत त्यांचे चेलेही असेच नावारूपाला आले. छगन भुजबळ, नारायण राणे, मनोहर जोशी, गणेश नाईक, आनंद दिघे, राज ठाकरे.. यांसारख्यांनी त्यांच्या त्यांच्या भागात दहशतीबरोबरच गडगंज संपत्तीही जमवली आहे. एके वेळी खुद्द बाळ ठाकरेंनीच कबूल केले होते की महाराष्ट्रात शिवसेनेपेक्षा 'कोहीनूर'च्या शाखा जास्त आहेत. शिवसेनेने याप्रकारे 'मराठी माणूस'ला न्याय देणारं कोणतंही ठोस कार्य केलेलं नाही. पण तरीही बाळ ठाकरेंची व शिवसेनेची प्रतिमा मात्र अशी बनविण्यात आली की ती महाराष्ट्र, मराठी भूमी, मराठी माणूस, त्याची अस्मिता, इतिहास व कला संस्कृतीचा आधार दिसावी. या दांभिकपणावर एक चांगलं कॅरिकेचर होऊ शकेल!

आज मुंबईचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललाय. ज्या जागेवर गिरण्यांच्या

चिमण्यातून धुर निघायचा व भोंगा वाजल्याबरोबर हे शहर धावू लागायचं, आता ती जीवंत गोष्ट इतिहासामध्ये दफन झाली आहे. आता त्या दफनभूमिवरच मोठमोठे मॉल्स, कॉम्प्लेक्स, बिग बाजार, मल्टीप्लेक्स, पब, बार, कॅसिनो, देशी–विदेशी भांडवलदारांची कार्यालयं, वित्त कंपन्यांची कार्यालयं... इत्यादी उभी झाली आहेत. मराठी माणसांना या शहरातून हद्दपार करण्यासाठी बाळ ठाकरेंनीच सुपारी घेऊन अमराठी भांडवलदारांना व लुटारू शासनाला पुरेपूर मदत केली आहे. अशा अनेक गिरण्यांच्या जमिनीवर शिवसेनेचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशींच्या मुलाने राज ठाकरेंच्या भागीदारीत 'कोहीनूर कॉम्प्लेक्स' बनविलेली आहेत. याच पंतांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात सहारा उद्योग समूहाचा ॲम्बी व्हॅली प्रकल्प मंजूर करण्यात आला होता. या प्रकारच्या चेष्टा मराठी माणसांची अवहेलना, उपेक्षा व अपमान नाही काय? याउलट अशा गोष्टींना योग्य ठरविण्यासाठी म्हटले जाते की, जेथे कुठे मराठी माणूस उद्योगधंद्यात व निर्माण व्यवसायात उतरेल त्याचे स्वागत झाले पाहिजे. पण सेनेच्या उच्चभ्रू नेत्यांशिवाय किती मराठी माणसं यात उतरू शकली?

राज ठाकरे ते मनोहर जोशी हे सारे ज्या बाळ ठाकरेंना आपले 'आद्य दैवत' मानायचे त्या आद्य दैवतावरील त्यांची श्रध्दा, त्यांच्या स्वतःच्या संपत्तीसमोर मात्र किती बेगडी आहे हे आता बाळ ठाकरे यांच्या स्मारकाच्या प्रश्नावरून स्पष्ट झाले आहे. शिवाजी पार्कवरच स्मारक झाले पाहिजे आणि त्यामध्ये कायद्याचा अडथळा येत असेल तर शिवसैनिकांनी कायदा हातात घेतला पाहिजे, अशी निर्वाणीची भाषा मनोहर जोशींनी केली, तर राज ठाकरेंच्या मनसेने दादरच्या ज्या इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करण्याचे शासनाने पूर्वीच मान्य केले आहे त्याच जागेवर ठाकरेंचे स्मारक बनविण्याची भाषा केली आहे. ते हे सारं बाळ ठाकरे या त्यांच्या दैवतावरील प्रेमापोटी करीत आहेत असे नसून दादरच्या शिवाजी पार्कसमोरील व शिवसेनेच्या मुख्यालयाच्या अगदी शेजारी बनत असलेल्या 2000 कोटी रूपयांच्या कोहिनूर कॉम्प्लेक्सला प्राणपणाने वाचविण्यासाठीच त्यांचा हा सारा आटापिटा चाललेला आहे. जे स्वतःच्या आद्य दैवताचे होऊ शकले नाहीत ते मराठी माणसांचे कसे होणार?

आजच्या ग्लोबल दुनियेत इंग्रजी म्हणजेच यश, नोकरीची हमखास गॅरंटी! असा गोंडस समज जनतेत व्यवस्थेने लोकप्रिय केल्यामुळे मुंबईसह संपूर्ण

राज्यात मराठी शाळा बंद होऊन इंग्रजी कॉन्वेंटांचा सुळसुळाट प्रचंड वाढला आहे. आता उद्धव व राज यांची मुलंच बॉम्बे स्कॉटिश (अमेरिकन) शाळेत शिकल्याचे वा शिकत असल्याचे म्हटल्यावर मराठी माणूस कसा मागे राहणार! मुंबईत गल्लीबोळात चायनीज वस्तु व खाद्य पदार्थांनी धुमाकूळ घातलाय. तसेच उडिपी, ईराणी, पंजाबी, गुजराती ते इटालियन पिज्जा–बर्गर, मॅक्डोनाल्ड रेस्टारेंटची भरमार आहे. आता बाळ ठाकरे यांनी स्वतःच ते बॉलीवुडचे बडे अभिनेते व बडे भांडवलदार यांच्यासोबत विदेशी दारू पितात म्हटल्यावर ती दारू पचवायला विदेशी खाद्य पदार्थ नकोत काय? मराठी माणसाने मात्र देशी दारू ढोसून वडा पाव किंवा झुणका भाकर खाऊन मराठी अस्मिता जागवावी व टिकवावी! आता हे विदेशी खाल्लं पिल्यावर मनोरंजनही खास नको काय? त्यासाठी ठाकरे कुटूंबियांना बॉलीवूड–हॉलीवुडच पाहिजे असतो. हिंदी व इंग्रजीच्या हिरो, हिरोईन्समध्ये असलेले ते 'ग्लॅमर' मराठी हिरो–हिरोईन्स मध्ये नाही असा त्यांचा समज आहे. सेनेचा वाचन व प्रबोधनाच्या संस्कृतीशी कधी संबंध आला नाही. बाळ ठाकरे यांनी एकच संस्कृती शिकवली, राडा संस्कृती!

याप्रकारे मागील ४६ वर्षात सिमेंट–कॉंक्रीटच्या जंगलात 'एकटा टायगर'चे 'राज्य' असूनही मराठी कला, साहित्य, संस्कृती, शिक्षण, जीवन व माणूस या सर्वांचे पानीपत झाले पण स्वाभिमानी 'मराठी माणूस'ने त्यासाठी 'टायगर'ला कधी जाब विचारला नाही. चंपासिंह थापा या नेपाळी माणसाला बाळ ठाकरे यांनी घरात ठेवून घेतलं होतं. त्यांच्या 'दिव्य' दृष्टीत एकाही मराठी माणसात जीवाला जीव देणारा शिवरायांचा शूर मावळा दिसला नाही काय? कुणाही मराठी माणसात असा सेवाभाव व ईमानदारी दिसली नाही काय? पूर्वी शिवसेनेचे सदस्य नसलेल्या चंद्रिका केनिया, प्रितीश नंदी, कन्हैयालाल गिडवाणी इत्यादी अमराठी लोकांना दिलेली उमेदवारी व या साऱ्या कृत्यांचे समर्थन शिवसेना नेत्यांना कोणत्या नाकाने करता येईल? इंदिरा गांधीच्या आणीबाणीच्या समर्थनाने ठाकरे यांची अटक होणे टळले, एवढी एक बाब सोडली तर किती मराठी माणसांचे भले झाले? मागील ४६ वर्षे 'मराठी'च्या नावावर केवळ पाखंडी राजकारण करण्यात आले. मराठी माणसांच्या मेंदूत निर्माण झालेली तथाकथित असुरक्षेची भावना व न्यूनगंड बाळ ठाकरेंच्या याच पाखंडाची फळं आहेत. याच न्यूनगंडावर स्वार होऊन बाळ ठाकरेंचं करिश्माई नेतृत्व पैदा झालं.

## करिश्माई मास लीडर ?

जालिमों इंसाफ के आईने में

अपनी सुरत देखकर डर जाओगे। – हसनैन कैफ

तो रस्त्यावर चालणारा आम माणूस होता, त्याच्यात आक्रोश भरलेला होता. हा आम माणूस आतल्या आत उकळत होता. व्यवस्थेविरोधात आवाज उठवू पाहत होता. काहीतरी करू बघत होता. ही एक पोकळी होती, जिला कुणी भरू शकला नव्हता. ज्याला समाजाची नाडी कळते, त्याला हेही कळते की समाजाला केव्हा व कशाची आवश्यकता आहे. समाजाला राजकारणामध्ये एका 'अँग्री यंग मॅन' ची गरज होती, जो नियमांना फाट्यावर मारायला तयार असेल. अशा काळाने बाळ ठाकरेंना जन्माला घातले.

संयुक्त महाराष्ट्र होऊनही सरकारी नोकरीत दक्षिणात्यांचा बोलबाला होता. अकुशल वा अर्धकुशल अशा मराठी तरूणांस कोणी वाली नव्हता. राज्याच्या राजधानीतच आपण उपरे व असुरक्षित असल्याची भावना मराठी भाषिकांत साचली होती. तिचा हिंसक निचरा करण्याची संधी बाळ ठाकरेंनी शिवसेना स्थापित करून दिली. टपोरी वर्गाला आकर्षित करणाऱ्या 'हटाव लुंगी बजाव पुंगी' यांसारख्या घोषणा देत सेनेने मुंबईतील मराठी घरांतील व मनातील असहाय्यता संकलित केली आणि सुरू झाली राडा संस्कृती! हिंसक हल्ले, तोडफोड, भय इत्यादींचा खुलेआम वापर होऊ लागला. ठाकरे यांच्या दहशतीपुढे सरकार झुकते, भांडवलदारही झुकतात, शाहरूखच्या 'डर'च्या जमान्यात भयाला सारेच सलाम करतात, असे चित्र दिसताच हीच संस्कृती पुढे रूढ झाली. काही सरकारी नोकऱ्या मिळण्याबरोबरच एअर इंडिया, महिंद्रा अँड महिंद्रा, इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स आदी बड्या कंपन्यांतही मराठी टक्का थोडा वाढला. या साऱ्या गोष्टी आम माणसासाठी करिश्मामयीच व थक्क करणाऱ्या होत्या. अशाप्रकारे ज्याचे नेहमीच काँग्रेसशी व अमराठी भांडवलदारांशी मागच्या दाराने सौहार्द्राचे संबंध होते असा करिश्मा असलेला नेता स्थापित करण्यात आला.

जर त्याला या लोकांनी (भांडवलदार + शासन) उपकृत केले नाही तर एखाद्या लहान मुलाप्रमाणे तो क्रोधित होऊन आदळआपट करायचा, झटका

द्यायचा, संघटनात्मक झुंडशाहीचा 'प्रोटेक्शन मनी'च्या वसुलीसाठी वापर करायचा आणि उद्योगपतींच्या अर्थव्यवस्थेला धक्का देण्यासाठी 'बंद' चे हत्त्यार उपसायचा. कालांतराने हे झटके खुप हिंसक व धोकादायक ठरले.

पुढे त्याने स्वतःला एका 'टायगर' प्रमाणे प्रस्तूत केले. वाघामध्ये क्षेत्रीयता असते, त्यांची एक सीमारेषा असते. त्या परिघातच तो 'राजा' असतो. जंगलातील इतर प्राण्यांप्रमाणे तो झुंडीत चालत नाही. कारण त्याला भय नसतं. तो शिकार करून आपलं पोट भरतो. पोट भरल्यावर तो अन्य प्राण्यांसाठी शिकर सोडून देतो. बाळ ठाकरेंनीही हेच केलं. त्याने आपल्या सेनेतील सैनिकांच्या भूकेचीही दक्षता घेतली. वाघ भयहीन प्राणी आहे. पण त्याचे भय त्याची ताकद वाढवते.

ठाकरे प्रचंड भित्रा माणूस आणि या भेकड माणसाने स्वतः:ला वाघाची उपमा दिली होती. म्हणूनच त्यांनी 'मातोश्री' वर एक गुहा बनवली व तेथे पोलीसांचा लोखंडी पहारा बसवला. कडेकोट सुरक्षेत राहुन तो नुसता भुंकायचा आणि लोकांचं जगणं असुरक्षित व भयभीत करायचा.

बाळ ठाकरे एक असे रसायन होते, जे कोडगेपणाने भरलेल्या खोडकर मुलाप्रमाणे होते. त्याला त्यांच्या पालकांना काबुत करता येणं अशक्य होतं. म्हणून त्याला उन्मत्त पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे पळायची, भुंकायची व चावायची मोकळीक हेतूतः दिली गेली आणि म्हणूनच त्यांच्या मुसक्या शासनाने कधी बांधल्या नाहीत.

ठाकरे अशा निष्ठावंतांचे हुकूमशहा होते, ज्या सैनिकांना वाटायचं की ते अशा संघटनेचे भाग आहेत, ज्यांना हिंसेद्वारे आपल्या भावना व्यक्त करण्याचे हक्क बहाल करण्यात आलेले आहेत. मुंबईतून मराठी माणसांचा टक्का कमी झाला, या मुद्यावर रान पेटवून ते भावना भडकवायचे. दुकानांचा विध्वंस, उत्तर व दक्षिण भारतीयांना मारझोड, दलित, मुस्लिम व कम्युनिस्टांचे शिरकाण करून भूमिपूत्रांच्या मराठी अस्मितेचं 'समाधान' केलं जाई. शहराला हिंसक धडे शिकवून ते 'विजयोत्सव' साजरा करीत. समजा राज्याने काही अडचणी त्यांच्या व धंद्यात निर्माण केल्या की ते आपल्या सैनिकांना राज्यविरोधी दंगली करण्याची संधी देत असत. त्यामुळे शासनाला त्या अडचणी पुढे चालू ठेवणे अशक्य होई! जर कुणी त्यांच्या पक्षाच्या हुकूमाची तामिली करायला तयार नसेल तर त्यांना अनैतिक गोष्टींचा पर्दाफाश करण्याची धमकी देण्यात येई. चित्रपट उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणावर लागणारा काळ्या पैसा देणाऱ्या व घेणाऱ्या बाबतची आतली खबर सैनिकांना लागली की ठाकरे या 'खबर' चा पाहिजे तेव्हा वापर करण्याची मुभा सैनिकांना देत. सैनिक घरं, दुकानं व थेटरांना आगी लावून 'धडा' शिकवायचे, वसुली करायचे. अशा संधीसाठी ते नेहमी आसूसलेले असायचे. कारण यातून त्यांना शक्तीशाली असल्याचा व गल्लीत सत्ता स्थापल्याचा भास व्हायचा आणि टी.व्ही.सेट व इतर किंमती सामानांची लयलूट करायलाही मिळायची. इतकंच काय, पोलीसांच्या हातून सहज सुटून जाऊ शकण्याची त्यांच्या सैनिकांना पक्की खात्री होती. कारण 'साहेबांचे' थेट पोलीसांसोबतच 'सेटींग' असल्याचे त्यांना ठाऊक होते.

राजकीय वातावरण तापत ठेवण्यासाठी लागणारी लाकडं या सैनिकांच्या रूपानं त्यांना मिळाली होती. त्या धगीवर नेत्यानं आपलं इप्सित साधलं होतं. पण ज्या स्वप्नांसाठी या सैनिकांनी आपला जीव पणाला लावला होता त्या मराठी माणसांची, मूठभर सैनिकांचं भलं वगळता आर्थिक व सांस्कृतिक उंची एका इंचाने सुध्दा वाढली नाही किंवा मराठी माणसांचा 'टक्का'ही वाढला नाही. या ग्रेट नेत्याला समकालीन प्रश्नाबाबतचं ज्ञान नव्हतं. जे होतं ते वरवरचं होतं. पुस्तके वाचण्यासाठी असतात हे त्यांना माहित नव्हतं. पण पुस्तके जाळण्याचे ज्ञान त्यांना ठाऊक होते. म्हणूनच ते एका प्रश्नावरून दुसऱ्या प्रश्नावर नुसत्याच कोलांटउड्या मारायचे. सातत्य, पाठपुरावा याचा अभाव व संधीसाधूपणा ही

त्यांच्या राजकारणाची खासियत होती. स्वतःच्या ध्येयासाठी ते स्वतःच्या पायावर उभे राहिले नाही. नेहमीच दुसऱ्यांच्या, आणि विशेषतः काँग्रेसच्या शेकोटीवर ते आपली पोळी भाजत राहिले. तेच त्यांचं ट्रेडमार्क होतं आणि तेच त्यांच्या नेतृत्वाचं दारिद्र्य होतं. आणि तरीही ते स्वतःची व शिवसेनेची 'मराठी माणसांचा पक्ष' व 'मराठी माणसांचा करिश्माई नायक' अशी प्रतिमा रंगवत राहिले. किती हा थोर बेशरमपणा! त्यांच्या राजकीय हालचाली, दगलबाजी व लबाड्या त्यांच्या भक्तांना दिसणे शक्यच नव्हते. म्हणून त्यांच्या भक्तांची त्यांच्यावरील श्रद्धा कमी झाली नाही आणि उत्तरोत्तर ठाकरेंच्या आदेशाची झटक्यात तामील करणाऱ्या 'रोबों'ची गर्दी वाढतच गेली.

१९७० चे दशक संपता संपता त्यांच्या भूमीपुत्राच्या सिद्धांतातील व संधीसाधू राजकीय आघाड्यां जांबुवंतराव धोटे ते नामदेव ढसाळ व जॉर्ज फर्नांडीस ते शरद पवार मधील अपील विलुप्त होऊ लागले होते. परिणामी १९८४ मध्ये त्यांनी हिंदुत्वास कवटाळले. ते आर.एस.एस.च्या ब्राम्हणी विचारधारेवर चालू लागले. नाथुराम गोडसेचे गोडवे गाऊ लागले. स्वयंघोषित 'हिंदु ह्रदयसम्राट' झाले. स्वतःला 'श्रद्धेचा राखणदार' घोषित करून हिंदुना आधार देण्याचा त्यांनी दावा केला. यासाठी पध्दतशीरपणे मुस्लिम विरोधी दंगली पेटवल्या. मुंबई, ठाणे, भिवंडी, कल्याण मध्ये कत्तली घडवल्या. गोबेल्स प्रचारतंत्राचा वापर करून मुस्लिमांना घुसखोर, देशद्रोही, गुन्हेगारी जगतातील प्रबळ राष्ट्रविरोधी शक्ती ठरविले. हे मत मतदारांच्या गळी उतरवले व मुंबईला चालत्या बोलत्या प्रेतांच्या शहरात बदलले.

भूमीपुत्रांच्या नोकऱ्या बळकावल्याचा आरोप करून दक्षिणात्यांवर हल्ले करणारे ठाकरे यांनी ९२-९३ च्या मुस्लिम विरोधी दंगलीत दक्षिणात्यांना वापरून घेतले. LTTE (लिबरेशन टायगर्स ऑफ तमिल ईलम)ला समर्थन दिले. LTTE वरील प्रतिबंध हटवून व त्यांना सोबत घेऊन भारत सरकारने आय.एस.आय. या पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेशी दोन हात करण्याचा तर्कट सल्ला दिला. त्यामुळे अनेक LTTE समर्थक दक्षिणात्य पुढाऱ्यांनी मुंबईच्या स्थानिक निवडणुकीत सेनेला मदत केली. पुढे उत्तर भारतीय स्थलांतरितांवर हल्ले केले. पण नंतर लगेच 'मी मुंबईकर' मोहीम सुरू करून यु टर्न मारला. ठाकरेंचा हा दुतोंडी व्यवहारच 'ठाकरे शैली' बनली होती. सत्ता आणि वसुलीसाठी ते त्यांनीच

घोषित केलेल्या शत्रुबरोबरही सार्वजनिकरित्या सहकार्य–आघाड्या करत. हे सारंच त्यांच्या सोयीच्या राजकारणाचे अव्वल नमूने होत. पण तरीही या शैलीलाच 'ठाकरी बाणा' आणि ठाकऱ्यांना 'करिश्माई मास लीडर' सांगण्यात येत आहे.

अशा या नेत्याकडे अनेक कला व कौशल्ये होती. तो आपल्या अनुयायांवर प्रचंड विश्वास असल्याचे दाखवायचा. तो अनुयायांचे खरोखर भले करीत असो वा नसो, नेत्याचा आपल्यावर प्रगाढ विश्वास आहे असे अनुयायांना सतत वाटत राहील अशी कृती तो वारंवार करायचा. या नेत्याची भाषा विलक्षण संवादी होती. आपल्या अनुयायांचा बुद्ध्यांक व भावनांक काय आहे, याची स्पष्ट जाण असल्याने त्यांचे लक्ष खिळवून ठेवील अशा रांगडी, आक्रमक भाषेचा गलिच्छ वापर करायचा. आपण ग्रेट आहोत हे पटविण्यासाठी त्याने शिवाजीचे चलनी नाणे वारंवार वापरले. संकटमय परिस्थितीत सतत अपयशाचे, अपमानाचे चटके सोसत असतांना ही भावना फारच सुखकर वाटते. जखम भळभळत असताना आरामदायी मलम जसे सुखकर वाटते तसे हा नेता होता. तो मनाला दिलासा द्यायचा. उभे राहण्यासाठी आधार द्यायचा. मनाला सांभाळून घ्यायचा. न्यूनगंड घालविण्यासाठी त्रास देणाऱ्या 'परकीयां'वर दरडवायचा. भावनिक गरजा पुरविणारा हा नेता ४६ वर्षापासून सतत मनाला गुंगी देतो, मस्तीत ठेवतो किंवा चुकीचे दिशादिग्दर्शन करतो याचा त्याने कुणाला थांगपत्ताच लागू दिला नाही. कारण त्यापूर्वीच त्याने लोकांच्या बुध्दी व विवेकाचा पाकिट गुल केलेला होता. तो आता विठ्ठल बनला होता. काळा गॉगल, गळ्यात रूद्राक्ष माळ आणि अंगावर भगवी वस्त्रे हे या नव्या विठ्ठलाचे रूप होते. तो आधुनिक भांडवलाचा सरंजामी देव बनला होता. म्हणूनच अर्धनारी नटेश्वरासारखा तो 'अर्धा अर्धा' होता. म्हणूनच लोक त्याच्यावर फिदा होते. त्याच्यासाठी ते झुंडीने गोळा व्हायचे आणि त्याच्या मृत्युने लोकांना स्वतःचे आईबाप गेल्यासारखे दुःखी केले. आता तो बडव्यांचा 'विठ्ठल' असल्यामुळे बडव्यांनी विठ्ठलाचे मार्केटिंग करण्यासाठी त्याचे लगेच स्मारक (मंदीर) बनविण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी शिवाजी पार्कवरच पूजा, अर्चना, भजन व किर्तनाचा सत्संग थाटला .

नेत्यांचा करिश्मा मंत्रमुग्ध करतो, थक्क करून टाकतो. अनेकदा तो त्या काळातील व्यवस्थेच्या गरजेतून पैदा होतो. पण त्यातून समस्या सुटत नाहीत. म्हणून समाजाला गरज असते ती त्या पलिकडे जाणाऱ्या नेतृत्वाची, जो

समाजपरिवर्तनाला गती देईल. आणि बाळ ठाकरे यांचे नेतृत्व तर या कॅटेगरीत बसणारे नव्हतेच.

## ब्राम्हणी वर्चस्ववादाचा फॅसिस्ट डॉन : बाळ ठाकरे

'आपल्याला या दळभद्र्या लोकशाहीपेक्षा छत्रपतींची शिवशाही अधिक प्रिय आहे', असे सतत म्हणणाऱ्या शिवसेनाप्रमुखांनी आपल्या सेनेचा कारभार आपल्याच पध्दतीने व लोकशाहीला धाब्यावर बसवूनच चालविला. त्यांनी त्यांचे हिटलरवरील प्रेम कधीही लपवून ठेवले नाही. म्हणूनच इंदिरा गांधींनी २५ जून १९७५ रोजी देशावर लादलेल्या आणीबाणीचे त्यांनी जाहीरपणे समर्थन केले. हा 'एकटा टायगर' त्यावेळी साध्या अटकेला घाबरला होता. जसे हिटलरचे राजकारण लहरीपणाचे होते, बाळ ठाकरेंचा लहरीपणाही काही कमी नव्हता. त्यांच्या लहरीपणामुळे निरपराध माणसं मारली गेली तरी त्याच्याशी त्यांना काहीही देणं घेणं नव्हतं. त्यांचे प्रशिक्षित सैनिक क्रिकेटची खेळपट्टी खोदू शकतात. कारण ठाकरेंनी भारत–पाकिस्तानचा क्रिकेट सामना तेथे होऊ नये असे म्हटलेले असते. हेच ठाकरे पाकिस्तानच्या जावेद मियांदादला घरी आमंत्रित करतात. याचा त्यांच्या भक्त सैनिकांना काहीही फरक पडत नाही. म्हणजेच ठाकरेंचा आदेश पाळायचा असतो, मग त्यांचे सामाजिक वर्तन कितीही विसंगत असो! 'देवा'ला किंवा 'हिटलर'ला प्रश्न किंवा साधी शंका सुध्दा विचारायची नसते 'हेच खरे'!

हिटलर ने वंशश्रेष्ठत्वाच्या फॅसिस्ट विचारापायी लाखो लोकांना गॅस चेंबरमध्ये खतम केले व युद्धातही मारले. इकडे बाळ ठाकरे यांनी हिंदुत्ववाद, म्हणजेच ब्राम्हणी वर्चस्ववाद पुनर्स्थापित करण्यासाठी आधी दलितांचे मुडदे पाडले. १९७४ ची मुंबईतील वरळीची दंगल, नामांतर चळवळीच्या वेळी संपूर्ण मराठवाड्यात दलितांच्या माय–बहिणींवर बलात्कार केले, सामूहिक कत्तली केल्या, घरादारांची राखरांगोळी केली. त्यावेळी दलितांच्या कत्तलींचे लोण विदर्भातही पसरले होते. त्यानंतरच या भागात शिवसेनेचा जोम वाढला. युतीच्या शासन काळात मुंबईच्या रमाबाईनगर येथे पोलीसांनी १० दलितांचे मुडदे पाडले व त्याचे समर्थन बाळ ठाकरे यांनी निर्लज्जपणे केले होते. रिडल्स प्रकरणी सुध्दा प्रतिगामी भूमिका घेत मुंबईत २ लाखाचा मोर्चा काढला होता. पण त्यांच्या या

हल्ल्याच्या प्रतिकारार्थ आंबेडकरी जनतेने ५ लाखाचा मोर्चा मुंबईतच काढून 'ढाण्या वाघा' च्या मुसक्या त्याच्याच सुरक्षित गुहेत बांधल्या होत्या.

शिवसेनाप्रमुखांनी जातीपातीचे राजकारण कधीही केले नाही, याचे तुणतुणे सतत वाजवले जाते. पण बहुजन जातींना आरक्षण देणाऱ्या मंडल आयोगाला त्यांनी कसून विरोध केला. बहुजन (मराठा–कुणबी) जातींमध्ये 'जनाधार' असलेल्या पण उच्चवर्गीय नेतृत्व असलेल्या शिवसेनेच्या या भूमिकेमुळेच सेनेचा पाया ढासळू लागला. या पडझडीला सावरण्यासाठीच सेनेने भावनात्मक हिंदुत्त्ववादाला उचलून धरले. भारतीय जनता पक्षापेक्षाही जास्त आक्रमकता दाखवत त्यांनी मुस्लिमविरोधाचा झेंडा खांद्यावर घेतला. साम, दाम, दंड, भेद नीतीचा सर्रास वापर करीत दंगली, विध्वंस, मृत्यु, द्वेष आणि दहशतीचं साम्राज्य त्यांनी पसरवलं. जनतेला सततच्या दहशतीत व असुरक्षिततेत ढकलून स्वतःसाठी मात्र त्यांनी पोलीसांच्या पहाऱ्यातील सुरक्षित 'किल्ला' निर्माण केला.

१९९२ मध्ये संघाच्या टोळ्या व शिवसैनिकांनी बाबरी मशीद पाडल्यावर ठाकरे यांनी गर्व प्रकट केला व अख्खी मुंबई दंगलीत लोटली. निरपराध मुस्लिमांचे अमानुष शिरकाण (वंश संहार) करण्यात आले. लूट, बलात्कार आम बात होती. अनेक आठवडे मुंबई जळत होती आणि स्कॉटलँड यार्डच्या पोलीसांशी स्पर्धा करण्याच्या बाता करणारे मुंबईचे 'भगवे' पोलीस मात्र हेतूंतः ही आग रोखण्यात अपयशी ठरले होते. मुस्लिमांच्या वंशसंहाराचे व्रण या शहरावर

नेहमीसाठी उमटले. हजारो नागरिकांना हे शहर कायमचे सोडून पळावे लागले. हे शहर आता माणसांना राहण्यालायकीचे राहिलेले नव्हते.

मुस्लिमांच्या या कत्तलींसाठी श्रीकृष्ण आयोगाने बाळ ठाकरेंवर स्पष्ट शब्दात ठपका ठेवूनही त्यासाठी त्यांना कधी अटक झाली नाही. सत्ता, संपत्ती व गँग बाळगणाऱ्या आदरणीय व्यक्तींना न्याय देवता घाबरते. शिवाय शासनाच्याच माणसाला अटक करणे शासनालाही शोभले नसते. डॉन, टायगर, हिंदु हृदयसम्राट अशी बिरूदं मिरवणाऱ्या बाळ ठाकरेंची 'शान', 'दहशत', 'उपद्रव्य मूल्य' सारंच धुळीला मिळालं असतं आणि मग या पैसेवाल्या मुंबईचं सरंक्षण कुणी केलं असतं? वित्तीय भांडवल, सट्टेबाज भांडवल, काळे भांडवल, माफिया भांडवल, गुन्हेगारी भांडवल... तऱ्हेतऱ्हेच्या भांडवलाचं संरक्षण कुणी केलं असतं? देशाच्या आर्थिक राजधानीत एकीकडे पैशावर लोळणारा वर्ग आहे तर दुसरा कंगाल, दरिद्री, उपासमारी, रोगराई व झोपडपट्ट्यांच्या कोंडवाड्यात जगायला मजबूर असा वर्ग आहे. हा श्रमजीवी वर्ग त्याच्या हितसंबंधामुळेच क्रांतिकारी असतो व तोच मुठभरांची सत्ता उलथवून समाजवाद आणू शकतो. तो एकजूट न होण्यातच भांडवलदारांचे हित असते. भांडवलदारांचे व लुटारू सत्ताधाऱ्यांचे हित सांभाळण्यासाठी व्यवस्थेला अशा हिटलरची, सरंजामी देवाची गरज असते, जो दलित–श्रमिक वर्गाला आपल्या भाषेने आपलेसे करतो व जात, धर्म, भाषा, अस्मिता, राष्ट्रवादाचे सोंग पांघरून जनतेला कोंबड्यांप्रमाणे आपआपसातच झुंजवत ठेवतो. 'लिंबू' फिरवून भेज्यात केमिकल लोचा करतो. मग माणसे आरामात एकमेकाला कापत सुटतात. यासाठी त्याने सर्वसामान्यांना बेसहारा करणाऱ्या उद्योग समूहांपासून ते अनेक सरकारे आणि 'दुनिया मुठ्ठी में' करु पाहणाऱ्या अंबानीसारख्या लुटारू वर्गाकडून सुपारी घेतलेली असते, ही गोष्ट धूर्तपणे लपवून ठेवली जाते. असे करतांना तो संघटित ट्रेड युनियनचे कंबरडे मोडण्यासाठी ट्रेड युनियन नेते आमदार कॉ. कृष्णा देसाईंची सामूहिक हत्या घडवून आणतो. कॉंग्रेसचे पोलीस कारवाई करीत नाहीत, त्यामुळे दहशतीत पुन्हा वाढ होते. उद्योगपती खूष होतात. ठाकरेंच्या बंगल्यावर पार्टी होते. जल्लोष होतो. पांढऱ्या दारूचे बार उडवले जातात. या जल्लोष पार्टीबाबत माध्यमांमध्ये कंड्या पिकवल्या जातात. त्यांच्या मोहमयी, प्रेमळ, हजरजबाबी, कलाप्रेमी, कुटुंबवत्सल, दिलदारपणाचा खूप उदोउदो केला जातो. भांडवली, कॉर्पोरेट, उच्चजातीय

ब्राम्हणी मीडियाने आम्हाला ठाकरे यांची अनेक गरीब, साधारण सैनिकाशी व जनतेशी कशी मैत्री आहे आणि ते त्यांना आपल्या शाही दरबारात किती आपुलकीने वागवतात याचीही रसरशीत वर्णने ऐकवली. पण त्यांची खरी सलगी जनतेच्या शत्रुंशी होती हे मात्र कुणीही सांगितले नाही.

एकेकाळी दिलीपकुमार मुसलमान असल्यामुळे ठाकरेंनी त्यांच्या विरोधात विष कालवले पण स्वत: दिलीपकुमार यांना घरी बोलावले. जिगरी यार प्रमाणे दारू पाजली. गप्पांची मैफल जमवली. त्याचप्रमाणे बोफोर्स प्रकरणी अमिताभ बच्चनचे नाव आल्यावर त्यांनी अमिताभच्या चित्रपट प्रदर्शनावर बंदी लावली. पण त्यांनाही घरी बोलावून ते 'दोस्ताना' व 'याराना' निभावत राहिले. १९९० च्या दशकात डी (दाऊद) कंपनीच्या बॉलीवुडमधील खंडणीसाठीच्या दादागिरी विरूध्द हस्तक्षेप केला आणि आपली दादागिरी स्थापित केली. मग फिल्म स्टार निर्मात्यांसोबतची भांडणं मिटविण्यासाठी, मांडवली साठी ठाकरेंच्या दरबारात जावू लागले. या 'फिल्मी' देवाण घेवाणीत धोका नव्हता. परत ठाकरे ठरले कलेचे दर्दी! मग सारेच बडे बडे स्टार्स ठाकरेंच्या मोहमयी व्यक्तित्वाविषयी सार्वजनिकरित्या बोलू लागले, लवून 'मुजरा' करू लागले. आम जनतेला हे दृष्यसुध्दा खूप सुखावणारं होतं.

ज्या शिवसेनेचा जन्मापासून हिंसेचा प्रदीर्घ इतिहास आहे, ज्या सेनेने सांप्रदायिक, जातीवादी, कम्युनिस्टविरोधी, खोट्या अस्मितेचे हिटलरी राजकारण केले त्यासाठी हजारो दलित, श्रमिक, मुस्लिम आणि इतर अल्पसंख्यांक जनतेचे खून केले, समाजात दुफळी माजवली, संविधानावर अर्वाच्य टीका केली, बाबासाहेबांची टिंगलटवाळी केली, पुरूषी प्रतिकात्मक व अश्लिल–शिवराळ भाषेचा सर्रास वापर केला... तरीही या सेनेच्या मुखंडाला अटक करण्याचे धाडस ग्रेट 'लोकशाही' शासनाने हेतूत: दाखवले नाही. एरवी जे लोक विरोधात आवाज उठवतात त्यांची राज्याकडून थंड डोक्याने शिकार केली जाते. याउलट वसंतराव नाईकांपासून तर शरद पवारांपर्यंत सर्वांनीच ठाकरेंच्या ताकदीविषयी अतिशयोक्तीने कंड्या पिकवल्या. अशाप्रकारे 'समांतर ठाकरी सत्ता' स्थापित करण्यात त्या सर्वांनी जाणीवपूर्वक हातभार लावला.

त्यांच्यावरील २४ फौजदारी खटल्यांपैकी १६ खटले खारीज करण्यात

आले व ७ खटले सेना–भाजप युतीच्या शासनकाळात मागे घेण्यात आले. त्यांच्या मरणानंतर बाबरी मशीद खटल्यातून त्यांचे नाव गाळून टाकण्यात आले. या साऱ्या मेहरबानीस कारण हे की ठाकरे कधीच व्यवस्थाविरोधी नव्हते. संसद आणि विधान मंडळातून सुरू असलेल्या देश विक्रीच्या देशद्रोही राजकारणाचे ते सुद्धा खंदे समर्थक होते. जगाचा दुश्मन असलेल्या अमेरिकन साम्राज्यवादासोबत दलालीच्या राजकारणाचेही ते समर्थक होते. त्यामुळेच व्यवस्थेकडून वेळोवेळी त्यांना 'हजार खून माफ' अशा प्रकारचे अनेक पुरस्कार देण्यात आले. याप्रकारे ठाकरे आणि काँग्रेस+राष्ट्रवादी हे जनविरोधी आर्थिक राजकारणाचे पक्के बिझनेस 'पार्टनर' होते हे स्पष्ट होते.

देशात आज मुस्लिम विरोधी राजकारणाचा बोलबाला आहे. मुस्लिमांचा कत्तली सुरू आहेत. हिंदुत्ववादी फॅसिस्ट राज्य स्थापन करण्याच्या योजनेनुसार त्यांचा पध्दतशीर सफाया सुरू आहे. त्यांचे जगणेच हराम झाले आहे असे नाही, तर त्यांच्या भारतीयत्वावरच वेळोवेळी संशय उपस्थित करण्यात येत आहे. भारतातील न्यायपालिका ब्राम्हणवादाने ग्रासलेली असल्यामुळे मुस्लिमांवरील अन्याय दूर करण्यात ती 'यशस्वी' होऊ शकली नाही. दंगल, हिंसा, अन्याय, असंतोष, भय, भेदभाव व असुरक्षितता या सर्व प्रकारांमुळेच मुस्लिम तरूण पिढी लढाऊ प्रतिकार करण्यासाठी धार्मिक जिहादाकडे ढकलली गेली. मुस्लिमांमधील समाज सुधारणेच्या भक्कम चळवळींचा अभाव आणि हिंदुत्ववादी फॅसिस्ट शक्तींना रस्त्यावर टक्कर देऊ शकणाऱ्या क्रांतिकारी चळवळींच्या कमकुवत-पणामुळे हे घडून आले. तसेच अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या जागतिक दादागिरीचेही यामागे संदर्भ आहेतच.

हिंदुत्ववादी फॅसिस्ट शक्तींच्या राज्य प्रायोजित दंगलीना काही बॉम्बस्फोटांनी कुणीतरी उत्तर दिले पण त्यासाठी संपूर्ण मुसलमान समाजावर 'दहशतवादी' व 'देशद्रोही' असा शिक्का मारण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारताच्या गुप्तहेर संस्थांच्या आजी–माजी अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनविलेल्या हिंदुत्व पॅटर्न या गुप्त योजनेत शिवसेनेचाही सहभाग होता असे म्हणण्याला मोठी जागा आहे हे महाराष्ट्राच्या माजी पोलिस महासंचालकाने लिहिलेल्या 'हू किल्ड करकरे' या पुस्तकावरून स्पष्ट होते. बाळ ठाकरे यांनीही २००२ आणि २००८ साली मुस्लिमांवर हल्ले करण्यासाठी हिंदुंना आत्मघाती

पथके तयार करण्याचे खुलेआम आवाहन केले होते. मुंबईत १९९३ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांपासून या मालिकेला सुरूवात झाली आणि कुठेही बॉम्बस्फोट झाले असता त्या परिसरातील हजारो मुस्लिमांना संशयित म्हणून अटक करण्यात आली. ही एक बेबंदशाही आहे. ह्या क्रूरकर्म्यांना जाब विचारणारा कुणी नसल्याने ही मनमानी चालूच आहे.

पण मालेगाव (नाशिक) येथे झालेल्या बॉम्बस्फोटामुळे पोलीस, शासन आणि हिंदुत्ववाद्यांची मात्र गोची झाली आहे. मालेगाव प्रकरणी साध्वी प्रज्ञा सिंग, कर्नल पुरोहित, रिटायर्ड मेजर रमेश उपाध्याय, दयानंद पांडे व इतर ७ लोकांना दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) अटक केली. त्यांचा संबंध आर.एस.एस. व तिच्या इतर संघटनांशी असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणाचे धागेदोरे इतर बॉम्बस्फोटापर्यंतही जाताच देशभरात खळबळ माजली. हा तपास चालू असतांनाच शिवसेना, भाजप, बजरंग दल, विश्व हिंदु परिषद व इतर हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या संघटनांनी एटीएस प्रमुख हेमंत करकरे व इतर अधिकाऱ्यांविरूद जोरदार मोहीम उघडली. जेव्हा मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात साध्वी प्रज्ञा सिंग व इतरांना 'मोक्का' कायदा लावण्यात आला तेव्हा 'दैनिक सामना' मध्ये 'शेम शेम शेम–हिंदुत्वाला मोक्का' अशी ओरड केली गेली. हेमंत करकरे यांनी साध्वी प्रज्ञा सिंग व इतर आरोपींचा छळ केला म्हणून त्यांच्याविरूद्ध कारवाई करण्यात यावी याकरिता मुंबई उच्च न्यायालयात रीट अर्ज दाखल केला. इतकेच नव्हे तर 'एटीएसवर महाराष्ट्राची जनता थुंकते', 'लवकरच हिंदुत्वाचा विजय होणार आहे व जनता त्यांची धिंड काढेल', 'लवकरात लवकर या टोळींची नावे, घर पत्त्यासह आम्ही प्रसिध्द करणार असून त्यांच्या घरातील बायका–पोरांना हे लोक काय लायकीचे आहेत हे समजेल', अशी गर्भित धमकी देण्यात आली होती. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात यावा असे आवाहन 'सामना' मधून लोकांना करण्यात आले होते. तसेच शिवसेना व भाजपा यांनी साध्वी प्रज्ञा सिंग व इतरांना पाठींबा म्हणून व सरकारच्या विरोधात १ डिसेंबर २००८ ला संपूर्ण राज्यात बंदची घोषणा केली होती. यादरम्यान करकरेंना पुण्यावरून धमकीचे फोन प्राप्त झाले होते. परंतु मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या हल्ल्यामुळे शिवसेना–भाजपला बंद तर मागे घ्यावा लागलाच परंतु साध्वी, साधु, कर्नल आणि मेजरला बेड्या ठोकणारे हेमंत करकरे वाईट आणि 'शहीद' करकरे

हे महान अशी दुतोंडी भूमिका त्यांना घ्यावी लागली. जनतेला हे कुठला आदर्श शिकवणार?

'मुस्लिम समाजातील लोक ह्या घातपाती कारवाया करीत नसून त्यांच्या नावाखाली दुसरेच कुणीतरी या कारवाया घडवून आणतात आणि हाच तर आहे पॉवर गेम!' हा माजी न्यायमुर्ती बी.एन.वाघ यांचा निष्कर्ष संयुक्तिक वाटतो. (साप्ताहिक, बहुजन चेतना, ऑगस्ट २००६)

महात्मा जोतीराव फुले यांनी गुलामगिरी या पुस्तकात लिहिले आहे की, "भट–ब्राम्हणांना एखाद्या व्यक्तीकडून एखादी गोष्ट मिळवायची असल्यास ते त्या इसमाच्या घरासमोर जावून स्वतःच्या अंगावर चाकूने वार करून समोरच्या व्यक्तिच्या मनात दहशत निर्माण करीत ती वस्तु मिळवीत." महात्मा फुलेंचं हे भेदक निरीक्षण आजच्या घडामोडींवरही लागू पडते.

हिटलरने देशाची संसद जाळून ती कम्युनिस्टांनी जाळल्याचा कांगावा केला. असे करून हिटलरला कम्युनिस्टांवर क्रूर दडपशाही करणे सोपे गेले. हिटलरप्रेमी बाळ ठाकरेंचा बॉम्बस्फोटांबाबतचा कांगावा असाच होता आणि साध्वीला अटक करून करकरेंनी या बनवाबनवीला सुरुंग लावला होता. म्हणूनच एका व्यापक कटांतर्गत हिंदुत्ववादी ब्राम्हणी व्यवस्थेने करकरेंचा गेम केला असावा असा संशय व्यक्त करायला जागा आहे. कारण त्यांच्या हिंदुत्ववादाच्या योजनेत माणसांची काहीच किंमत नाही. सत्तेची झिंग जेव्हा चढते तेव्हा सारासार विचारांची अपेक्षा करता येत नाही.

कोणतीही वस्तू ज्यामध्ये बुध्दी, तर्क, कारण, पुरावा आणि साक्ष्य यांसारखे कोणतेही पैलू नसतात, ती आस्था होय. आस्था मानवाकडून खूप चांगले कार्यसुध्दा करवू शकते आणि खूप वाईटही. बाळ ठाकरेंचे 'आत्म'घाती हल्लेखोर लोक केवळ आस्थावान आहेत, ते तर्कशील असते तर त्यांनी असे केले नसते. आस्था एक आंधळा मार्ग आहे. आस्था तुमच्याकडून तुमचा मेंदू हिसकावून घेते. मेंदूच काढून घेतल्यावर मग फॅसिस्ट आपल्याशी काय खतरनाक खेळ खेळत आहे हे कळणार कसं? मेंदूच नसेल तर विवेक कुठून येणार? मग तो खरं बोलतो आहे की खोटं, हे तरी कसं कळणार?

आपले आचरण कोणत्या परिस्थितीत बरोबर आणि केव्हा चूक असेल हे

आपल्या लाखो वर्षांच्या विकासयात्रेच्या परिणामी आपण शिकलोय आणि ते आता आपल्या डी.एन.ए. मध्येही आलं आहे. कोणत्याही गोष्टीवर वा आस्था/विश्वासावर भरवसा ठेवण्यापूर्वी एका मोठ्या लोकसंख्येला हे आता समजून घेण्याची गरज आहे की त्यांनी नेहमी सतर्क राहिले पाहिजे. प्रत्येक विश्वासाला, प्रत्येक गोष्टीला प्रश्न करा, शंका उपस्थित करा. कारण जीवन एकदाच मिळतं, ते एकदाच जगलं जातं आणि आपल्याजवळ केवळ हीच एक संधी आहे.

## हिंदूत्ववाद म्हणजेच ब्राम्हणवाद

ब्राम्हणेतर चळवळीतून भट–ब्राम्हणांच्या गौडबंगालाची पोलखोल करत ब्राम्हणवादाच्या जोखडातून सर्वसामान्यांना मुक्त करण्यासाठी प्रबोधनकार ठाकरे आयुष्यभर झिजले. प्रबोधनकारांनी हिंदुंच्या तेहतीस कोटी देवतांना निकालात काढत त्यांच्या जागी एकट्या शिवाजी महाराजांना महाराष्ट्राचा राष्ट्रदेव म्हणून संबोधले. बाळ ठाकरेंनी मात्र आपल्या वडीलांच्या 'प्रबोधना'च्या वारशाला सपशेल मूठमाती दिली. एवढंच नव्हे तर त्यांची वर्तणूक ही प्रबोधनकारांच्या विचारांच्या अगदी विपरीत दिसते. स्वार्थी, मतलबी व सोयीच्या राजकारणासाठी बाळ ठाकरे यांनी गल्लीबोळात ब्राम्हणी शिवाजी पोहचवला. पुढे 'जय भवानी, जय शिवाजी'च्या नावावर बाळ ठाकऱ्यांचा सैनिक माणसं कापत सुटला. स्वातंत्र्य, समता, बंधुता नाकारणारी समाज व्यवस्था आणि मनुस्मृतीचे कायदे व दंड संहितेने चालणारे धर्मराज्य भारतात पुनर्स्थापित करणे हे बाळ ठाकरे यांचे दहशतवादी स्वप्न होते. याप्रकारे बाळ ठाकरे हिंदुत्ववादाच्या नावावर इतिहासाची चाके उलटी फिरवायला निघाले होते. जातिसंस्थेवर उभारणी केलेल्या जुन्या विषम समाजाचे सातत्य टिकावे हाच त्यांचा प्रधान हेतू होता. गांधी–टिळकांप्रमाणे ठाकरेही आपल्याला बर्बर आदिम जीवनाकडे घेऊन निघालेले होते. विषमता, भेदाभेद, शोषण व उच्च नीचतेवर उभी असलेल्या विषारी जातीव्यवस्थेचे ते कट्टर समर्थक होते. म्हणूनच त्यांनी मंडल आयोगाला विरोध करून जातीवाद पोसला होता. ते भांडवलदार वर्गाला अजिबात दुखवू इच्छित नव्हते. याउलट ते त्यांचे रक्षण करण्यासाठी कम्युनिस्टांच्या विरोधात रणमैदानात होते. ब्राम्हणी पितृसत्ता व जातीव्यवस्थेबरोबरच ते वर्गव्यवस्थेचेही

पुरस्कर्ते होते. त्यांच्या हिंदुत्ववादाचे अर्थशास्त्र सदोष होते, दरिद्री होते. झुणका भाकर व वडा पावच्या दुकानापलिकडे त्यांचं अर्थशास्त्र गेलं नाही. खाजगी मालकी, वर्ग–जाती भेद व स्त्री दास्य यावर आधारीत व्यवस्थेच्या उच्चाटनासाठी त्यांच्याकडे कोणताही विचार नव्हता, कृती कार्यक्रम नव्हता. एक कार्यक्रम त्यांनी जरूर दिला, लोकांना देवाधर्माच्या नादी लागण्याचा. त्यातच त्यांनी मुक्ति शोधली होती.

१९४७ नंतर भारतात नवी जाती–वर्ग व्यवस्था आली. भारतातील जनता या नव्या दुःखसागरात फेकली गेली तेव्हा तिची सामाजिक घडी विस्कटली. १९९१ नंतरच्या जागतिकीकरणाच्या त्सुनामीने भारतीय जनसामान्यांना बहुमुखी अरिष्टात ढकलले. त्यामुळे माणूस जुन्या संस्कृतीला मुकला. बाळ ठाकरेंच्या हिंदुत्ववादाने त्या माणसाला मराठी भाषा, संस्कृती, अस्मिता आणि आत्मभान देण्याच्या नावावर जातीप्रथेसह प्रतिगामी रूढी, परंपरा, सण व उत्सव यांच्या कॉर्पोरेटीकरणाचा सपाटा लावला. नव्या बाटलीत जुनीच दारू टाकून हिंदुत्ववादाच्या नावावर त्याच जुन्या प्रतिकारशून्य दैवी चमत्काराच्या चक्रात अडकवले. गणपती उत्सवासारख्या पारंपारिक रूढींमध्ये गुरफटवले, माणसाला 'हनुमाना'च्या म्हणजेच माकडाच्या आणि गाईच्या पाया पडायला लावले. जो माणूस बाह्य परिस्थितीचा व निसर्गाचा स्वामी होता त्याची ऐतिहासिक शक्ती आणि त्याचे महानपण हिरावून घेवून त्याला कूपमंडूक व गांडू बनविले. तो आता कम्प्युटरची पूजा करतो. मोबाईलवर पूजा करतो. व्यवस्थेतून पैदा होणाऱ्या बेरोजगार, कुंठीत, निराशावादी तरूणांच्या हातात दगड देऊन ठाकरेंनी त्या गर्दीचे रूपांतर गुंड टोळ्यांमध्ये केले. पण या दगडांची दिशा व्यवस्थेकडे नसल्याने व्यवस्थेचे रक्षण करणाऱ्या राखीव फौजेचेच ते कार्य करीत आहेत आणि या टोळ्यांच्या दहशतीच्या बळावरच बाळ ठाकरे 'डॉन' बनले. पण व्यवस्थेने निर्माण केलेलं ते एक बुजगावणं मात्र होतं. म्हणून अशा 'डॉन' चे वैयक्तिक मोठेपण, नैतिक शक्ती आणि आत्मबळ कितीही मोठे(?) असो, त्यांना भारतीय व्यवस्थेच्या विरूध्द जाता आलं नाही. जेव्हा जेव्हा ते तसे गेले तेव्हा तेव्हा ते एकाकी पडले. एकदा तुरूंगात, तर उर्वरित आयुष्य पोलीस पहाऱ्यातील स्वतःच्या गुहेत.

आज सामान्य जनतेत स्थान निर्माण करणाऱ्या नेतृत्त्वाच्या शोधात

असलेली भारतीय जनता म्हणूनच अस्वस्थ आहे. वरच्या पातळीवरून आखले जाणारे सामाजिक, आर्थिक व राजकीय डावपेच समजणे या सामान्य माणसांच्या कुवतीबाहेरचे असल्यामुळे त्यांची अस्वस्थता दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करणार आहे. आज देशातील सत्ताधारी वर्गाची वाटचाल नग्न फॅसिझमकडे जातांना आपण उघड्या डोळ्याने पाहत आहोतच. जागतिक व देशी आर्थिक संकट दिवसेंदिवस तीव्र होत आहे. त्याच्या सोडवणुकीसाठी भारतीय संसद लोकशाहीचा मुखवटा स्वतःच फाडून जनतेवर अधिकाधिक फॅसिस्ट दडपशाही लादत आहे. यासाठीच पोलीस, कायदा, विकास याबरोबरच बाळ ठाकरेरूपी हुकूमशहांची सुध्दा मदत होत असते. ती कधी खाप पंचायत, कधी भाषावाद, कधी जातीवादी गुंड, कधी सांप्रदायिक गुंड, कधी बॉम्बस्फोट करणारे, तर कधी आर्थिक सुधारणांचीही मदत घेते. या सर्वांच्या परिणामी परस्परातील हिंसाचार देशात क्रमाक्रमाने वाढत जाणार आहे. जात, धर्म, भाषा, अस्मिता आणि प्रदेश या भावनांना खतपाणी घालून हे काम हितसंबंधी करीत आहेत व बाळ ठाकरे यांच्या नंतरही ते करीत राहणार आहेत. या सर्व गदारोळात स्त्रिया सर्व प्रकारच्या अत्याचार व शोषणाच्या प्रमुख 'शिकार' बनत आहेत. यातून बाहेर पडण्याचा मार्ग सरळ धोपट नाही. तो व्यामिश्र आहे. त्यासाठी विविध आघाड्यांवर प्रबोधितांची व निष्ठावंतांची फौज निर्माण करावी लागेल. जाती, धर्म, भाषा, अस्मिता यासंबंधींचे संघर्ष प्रबोधनाच्या पातळीवर हाणून पाडावे लागतील आणि या संघर्षात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले असतील त्यांच्यावर सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात निकराचा घाव घालावा लागेल. हे काम एका जातीला किंवा पोट जातीला, एका धर्माला किंवा धर्मपंथाला, एका प्रदेशाला किंवा एका गटाला करता येण्यासारखे नाही. ते सर्व जाती, धर्म, भाषा, प्रदेशांच्या शोषितांच्या संघटीत शक्तीच्या जोरावर करावे लागेल. त्यासाठीच्या प्रत्यक्ष कृतीसाठी कराव्या लागणाऱ्या संघटनेकरीता फुले, आंबेडकर व भगतसिंग यांचे विचार प्रकाशवाट दाखवतील. हे कार्य तातडीने झाले नाही तर बाळ ठाकरे या ब्रॅण्डच्या राजकारणाने मानव समाज मरणाकडेच वाटचाल करील यात तिळमात्र शंका नाही. हा देश बाहेरच्या लोकांसाठी जरी लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व सहिष्णुतेच्या भावनिक गप्पा हाकत असला तरी या देशाच्या बहुसंख्य दलित, श्रमिक व अल्पसंख्यांकांसाठी हा देश म्हणजे भयावह दहशतवादाची

प्रयोगशाळा आहे. तसेच या देशाच्या उद्योगविश्वामध्ये व राजकारणामध्ये यशाच्या खऱ्या वाटा कुठे आणि कशा प्रकारच्या आहेत आणि त्या कशा पद्धतीने साध्य केल्या जातात हे बाळ ठाकरेंच्या इतिहासाने सिद्ध केलेले आहे. म्हणून सर्वव्यापी, सर्वस्पर्षी आणि बहुआयामी असे व्यक्तिमत्व अलिकडच्या काळात ठाकरे यांच्याच रूपाने निपजले आहे असे आज जनतेला सांगितले जात आहे. असे सांगणे शुद्ध थोतांड आहे. जात–वर्ग विभाजित समाजात वर्गजातीसमन्वयवादीच असे बनू शकतात. ते दलित, श्रमिक व अल्पसंख्यांक जनतेचे सच्चे मुक्तिदाते कधीही बनू शकत नाहीत.

इतिहासाच्या प्रेताला सोबत घेऊन आपण पुढे जाऊ शकणार नाही. आपल्याला नेहमीच वर्तमानात उभे व्हावे लागेल आणि तेथून इतिहासाकडे पहावे लागेल. आपल्याला हे ठरवावे लागणार आहे की आपण काय सोबत घ्यावं आणि काय सोडून द्यावं. ही निवड नवजागरणाच्या प्रकाशात करावी लागेल. मग टिळक व गांधींची चेतना आणि वारसा घेणे हे आपल्यासाठी काही आवश्यक असणार नाही. मानव मुक्तिचा समग्र वारसा म्हणुन जातीवर्ग, स्त्री दास्यअंताचा क्रांतिकारी वारसा फुले, आंबेडकर आणि भगतसिंगांचाच घ्यावा लागेल. हे महामानव अशा मानवी समाजासाठी लढा देत होते, ज्यामध्ये संपूर्ण समानता असेल. म्हणून तो आपला वारसा आहे. दलित, श्रमिकांचा वारसा आहे.

महात्मा जोतीराव फुल्यांनी ज्या अविवाहित, गर्भवती व विधवा स्त्रियांसाठी आश्रम उघडले, घरातच बाळंतपणाची सोय करून दिली, मुलांना दत्तक घेतले, ती मुलं आणि स्त्रिया त्यांच्या जातीच्या होत्या काय? ती समस्या शुद्रातिशूद्रांची होती काय? ती ब्राम्हणांची व सवर्णांची समस्या होती. ब्राम्हण व सवर्ण त्यांच्या गर्भवती कुमारीका वा विधवांना सोडून देत आणि महात्मा फुले त्यांचे वडील बनत. ते समाजातील सर्वाधिक दुःखीकष्टी अशा स्त्रीवर्गाचे आधार बनले व अनाथांचे पिता बनले. याच अर्थाने ते 'महात्मा' होते. मनुष्य प्राण्यांमध्ये अभेदता जोवर आपल्यात येणार नाही, समता व बंधुत्वाचे आचरण जोवर येणार नाही, दुःखीकष्टी पीडितांसाठी खरी संवेदना जोवर पाझरणार नाही तोवर आपण कोणतीही मुक्तिची लढाई लढण्याचा दावाच करू शकणार नाही. म्हणून बुध्दापासून तर सावित्रीबाईपर्यंतचा वारसाच मानव मुक्तिचा खरा वारसा आहे.

शोषित–पिडीत–दलित जनतेसाठी ठाकऱ्यांचा वारसा हा दुःखाचा, शोषणाचा वारसा आहे, मरणाचा वारसा आहे, विचार–संस्कृतीला गाडणारा वारसा आहे, असत्याचा वारसा आहे. म्हणून जनतेच्या या दुश्मनाला जनतेने आपल्या मेंदू आणि हृदयातून हद्दपार करावं, त्याच्या सावलीतून बाहेर पडावं, त्याच्या मायेतून बाहेर पडावं, त्याच्या भयातून बाहेर पडावं, त्याच्या मिथकांचं साम्राज्य उध्वस्त करावं, भांडवलाच्या या सरंजामी देवाच्या प्रतिमेवर विचारांचा एक दगड मारावा... हीच मुक्तिची पूर्वअट आहे................

"अब, अभिव्यक्ति के सारे खतरे उठाने ही होंगे
तोडने ही होंगे गढ और मठ सब..." — ग.मा.मुक्तिबोध

संदर्भ : १) कुमार केतकर – 'शिवसेना, कल, आज और कल,' पहल–८९
२) डॉ. रावसाहेब कसबे, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन
३) बी.एन.वाघ – 'पॉवर गेम' पुस्तिका, २००८
४) दै. लोकसत्ताचे संपादकीय – 'पहाड प्रस्थान', १८ नोव्हेंबर २०१२
५) प्रशांत दीक्षित, करिश्मा नावाचे गूढ, दै. लोकसत्ता, २० नोव्हें. २०१२
६) मिलींद भवार, 'प्रबोधनकारांचा वारसा आणि बाळ ठाकरे', परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ डिसेंबर २०१२

# खरा चेहरा

खुप वर्षापूर्वी एका मनःस्थितीबाबत वाचले होते. बायपोलर डिसऑर्डर. एका व्यक्तिच्या आंत मध्ये दोन एकदम विरोधी मूड असणे, हे त्या स्थितीचे लक्षण होय. मनोविकार तज्ञ यांस रोग संबोधतात. अशीच एक आणखीही स्थिती आहे, मल्टीपल पर्सनॅलिटी डिसऑर्डर. ज्यात एक व्यक्ति अनेक व्यक्तिप्रमाणे व्यवहार करीत असतो. ही सुद्धा एक स्थिती आहे, जिला रोग म्हटले जाते. हा आम व्यवहारापासून विचलीत मार्ग आहे. असे विचलन, जे दुसऱ्यांनाच नव्हे, स्वकियांना व भुमिपुत्रांनाही दुःख–कष्ट देतात. प्रभावित व्यक्ति कधी काय होईल आणि काय व्यवहार करेल, हे जाणणे महाकठीण होऊन जाते. एखाद्या विदुषकासारखे, ज्याच्या झोळीमध्ये अनेक प्रकारचे मुखवटे असतात. कधी हा घालतो तर कधी तो. या सर्वांमध्ये त्याचा स्वतःचा चेहरा तो विसरुन जात असावा.

हे विचलन जेव्हा रोग बनतो, तेव्हा तो कोणत्याही सीमारेषा जुमानत नाही. अनेकदा तो हिंसकही होतो. परंतु हा व्यवहार आपल्या अतिच्या सीमा पार केल्याविना, म्हणजेच आपल्या मर्यादेत टिकून राहिल्याचे आपण कधी–कुठे पाहिले आहे? चेहऱ्यावर चेहरे, अनेक चेहरे, जे एकाच चेहऱ्यावर येत जात राहतात. समजणे कठीण होते की, अशा माणसासोबत व्यवहार तरी कसा करावा... सडकेवर एक चेहरा, सत्ता हातात आल्यावर दुसरा चेहरा.

घरात तिसरा चेहरा, तर घोषित शत्रुसोबत एक चौथाच चेहरा... प्रत्येक चेहऱ्याचं एक उपद्रव मुल्य, एक उद्देश... एक सामान्य माणुस, ज्याचं सर्व काही सामान्य आहे, मग तरीही असा व्यवहार कां?

याचमुळे हा माणुस साधारण माणसांना ४६ वर्षेपर्यंत फसवत राहिला, गुंगारा देत राहिला... कधीही एका मतावर ठाम राहिला नाही, सतत कोलांटउड्या मारीत राहिला... कोणत्याही एका मुद्यासोबत जुडून राहू शकला नाही... जेव्हा बोलायचं असते, चुप राहतो. जेथे चुप राहायचं असते, तेथे ओरडत सुटतो... पुस्तकांनी ज्ञान, ज्ञानाने मती आणि मतीने गती वाढते. म्हणुन पुस्तकांशी ३६ चा आकडा. तो आता माणुस राहिलेला नसतो. त्याने स्वतःला 'देव' घोषित केलेले असते. भगवी वस्त्रे, गळ्यात व हातात १०८ मणक्यांच्या रुद्राक्ष माळा, डोळ्यावर जाड काळा चष्मा. ज्याने स्वतःला राजकारणातील आधुनिक देव सिद्ध करीत स्वतः भोवती उत्पात व बडव्यांची गँग व नादान भक्तांची गर्दी जमवली. हा देव जीवंत माणसांचा बळी मागायचा आणि मग राजकारणात हिंसक संस्कृती 'फॅशन' झाली. देशी व विदेशी कार्पोरेट जगतातील लोकांशी भेटीत 'मोगँबो खुश हुआ' प्रमाणे 'रंगात' यायचा. त्याची सारी तऱ्हाच न्यारी! आजचे सारेच देव मेंदुचा सॉफ्टवेअर बिघडलेले, डिसऑर्डर झालेले. म्हणुन प्रश्नांवरचा उतारा हमखास चुकतो.

यावर उपाय एकच. उसने चेहरे लावू नका. आपल्याच खऱ्या चेहऱ्यावर निर्भयतेनं प्रेम करा. आणि हे एवढं अजिबात सोपं नाही.

आपण जातीपाती मानत नाही अशी वल्गना करणाऱ्या बाळ ठाकरेंनी 'रिडल्स' मोर्चा दरम्यान हुतात्मा चौकात झालेल्या नासधूस प्रकरणी छगन भुजबळांकरवी हुतात्मा स्मारकावर गोमूत्र शिंपडून त्याचे शुध्दीकरण करवून घेतले व विसाव्या शतकातही दलितांच्या स्पर्शाने वस्तू 'बाटतात' ही आपली मनोभूमिका ठसवत आपण जातीपाती पलीकडे नाही तर जाती व्यवस्थेच्या पालखीचे भोई आहोत हे दाखवून दिले. पुढे १९९१ साली राज्याचे विरोधी पक्ष नेतेपद व १९९५ साली राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळाल्यावर ठाकरेंनी ओबीसी भुजबळांना डावलून भट मनोहर जोशींना पसंती दिली व आपल्या जातीय भूमिकेला अधोरेखित केले. (मिलींद भवार, 'प्रबोधनकारांचा वारसा आणि बाळ ठाकरे', परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ डिसेंबर २०१२)

# रिपब्लिकन पँथर्स

## जातिअंताची चळवळ



६ डिसेंबर २००७ रोजी चैत्यभूमी, मुंबई येथे साऱ्या महाराष्ट्रातील कृतीशील आंबेडकरवादी आणि पुरोगामी कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन 'रिपब्लिकन पँथर्स' या आघाडीची स्थापना केली. जातीव्यवस्था अंताचा लढा गतिमान करण्यासाठी व जातीय आतंकवादाविरूध्द प्रदीर्घ लढा उभारण्यासाठी 'रिपब्लिकन पँथर्स' हे लढाऊ संघटन स्थापन करण्यात आले.

'रमाबाई आंबेडकरनगर-खैरलांजी हत्याकांड विरोधी संघर्ष समिती, महाराष्ट्र'चे राज्याच्या जिल्ह्या-जिल्ह्यातील कार्यकर्ते, सहानुभूतीदार आणि समर्थकांच्या दुर्दम्य इच्छेनुरूप हे संघटन स्थापन करण्यात आले. खैरलांजीच्या अमानुष व अतिक्रूर हत्याकांडानंतर उद्‌भवलेली परिस्थिती आणि शासनाच्या दलितद्वेषी 'फॅसिस्ट' जुलूमशाहीमूळे फुले-आंबेडकरी समाजातील तरुणांच्या मनात खदखदणाऱ्या क्रांतिकारी असंतोषाला जातीअंताच्या लढ्यात रुपांतरीत करणारे आंबेडकरी संघटन उभे करणे परिस्थितीने अपरिहार्य केले होते. त्याच्या परिणामी 'रिपब्लिकन पँथर्स'ची स्थापना करण्यात आली.

'रिपब्लिकन पँथर्स हे संघटन सर्वजातीय, सर्वधर्मीय, सर्वभाषिक जनतेचे धर्मनिरपेक्ष व लोकशाहीवादी जनसंघटन म्हणून कार्यरत आहे. तसेच ही संघटना जातीव्यवस्था बळकट करणाऱ्या निवडणुकीच्या राजकारणात उतरणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्टेट सोशॅलिझमचा क्रांतिकारी विचार रिपब्लिकन संकल्पनेत आहे. तसेच शहीद भगतसिंगांच्या 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' ची क्रांतीकारकता आणि 'ब्लॅक पँथर्स' व 'दलित पँथर'ची क्रांतीकारक परंपरा 'रिपब्लिकन पँथर्स'चे आदर्श आहेत.

उच्च जात वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे सेना-भाजपाचे सरकार असो की काँग्रेस-राष्ट्रवादीचे, दोघेही दलितांवर अत्याचार करण्याबाबत जातनंगे आहेत, अशी रोखठोख भूमिका घेऊन 'रिपब्लिकन पँथर्स' महाराष्ट्राच्या भूमीत ठामपणे पाय रोवायचा प्रयत्न करीत आहे. चळवळीतील सौदेबाजी, डरपोकपणा, लाचारी, गुलामी गाडून स्वाभिमानी व स्वनिर्भर चळवळ फुले, आंबेडकर व भगतसिंग यांच्या वैचारिक पायावर उभी करणे आजच्या काळाची गरज बनली आहे. या वैचारिक पायावर शिस्तबध्द संघटन निर्माण करण्यासाठी डोक्याला कफन बांधून आंबेडकरी तरूण जातीअंताच्या महासंघर्षात उतरत आहे. मागील लढ्याच्या अनुभवातून तो पुन्हा पँथरची झेप घेणार आहे. क्रांतीकारक आंबेडकरी व मार्क्सवादी विचारांचा नवा विकास घडवून तो या रणात उतरत आहे.

अत्याचार मुक्त प्रदेश निर्माण करत करत, संपूर्ण देश अत्याचार मुक्त करण्यासाठी आपणही या स्वतःच्या प्रतिकारक्षम लढाऊ संघटनेचे कृतीशील घटक व्हावे, गाव तेथे छावणी बनवावी, नेतृत्व करावे व जात, वर्ग, स्त्री दास्य अंताच्या लढ्याला गतिमान करून सर्वदूर पोहचवावे. जेथे अत्याचार होईल तेथे परिस्थितीच्या गरजेनुसार मदतीला धावून जाण्याची गरज आहे. फुले, आंबेडकर व भगतसिंग यांना अपेक्षित असलेल्या शोषणमुक्त समाज निर्मितीचा ध्यास घेणारे आपण सारे अग्रक्रमाने हे करूयाच.

### संपर्क


| | | | |
|---|---|---|---|
| शरद गायकवाड (अध्यक्ष)<br>मो.: ९७०२७०७५८३ | सुमेध जाधव (सरचिटणीस)<br>मो.: ९८६९२६८७६८ | जिंदा भगत (उपाध्यक्ष)<br>मो.: ९३२६६०८८९९ | अनंत लोखंडे (उपाध्यक्ष)<br>मो.: ९२७२५५५२२३ |
| विरा साथीदार<br>(विदर्भ प्रतिनिधी)<br>मो. : ९१४५७६४१९४ | श्याम सोनार<br>(प्रसिध्दी प्रमुख)<br>मो. : ८०८०८२९४९९ | गोपाल शेळके<br>(मराठवाडा प्रतिनिधी)<br>मो. : ८६५७४६५३७२ | जितेंद्र माशाळे<br>(चिटणीस)<br>मो. : ९३२५५८४२०८ |

# बर्बरता की ढाल ठाकरे

बाल ठाकरे! बाल ठाकरे!
कैसे फासिस्टी प्रभुओं–
की गला रहा है दाल ठाकरे!
अबे संभल जा, वो आ पहुँचा बाल ठाकरे!
सबने हां की, कौन ना करे!
छिप जा, मत तू उधर ताक रे!
शिव–सेना की वर्दी डाटे जमा रहा लय–ताल ठाकरे!
सभी डर गये, बजा रहा है गाल ठाकरे!
अपने भक्तों को कर देगा अब तो मालामाल ठाकरे!
गूँज रही सह्याद्रि घाटियाँ, मचा रहा भूचाल ठाकरे!
मन ही मन कहते राजा जी, जिये भला सौ साल ठाकरे!
चुप है कवि, डरता है शायद, खींच नहीं ले खाल ठाकरे!
कौन नही फंसता है, देखें, बिछा चुका है जाल ठाकरे!
बाल ठाकरे! बाल ठाकरे! बाल ठाकरे! बाल ठाकरे!
बर्बरता की ढाल ठाकरे!
प्रजातंत्र का काल ठाकरे!
धन–पिशाच के इंगित पाकर ऊँचा करता भाल ठाकरे!
चला पुछने मुसोलिनी से अपने दिल का हाल ठाकरे!
बाल ठाकरे! बाल ठाकरे! बाल ठाकरे! बाल ठाकरे!

(जुन १९७० च्या 'जनयुग' मध्ये प्रकाशित बाबा नागार्जुन यांची कविता)